सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २ जुलै २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ७९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मर्चंट ऑफिसरला जीवनदान

नवी मुंबई : नवी मुंबईतील अपलो हॉस्पिटल्सच्या डॉक्टरांनी एका ३७ वर्षीय रँकिंग ऑफिसर (मर्चंट नेव्ही) अली रझा खल्फे यांना मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढलं आहे.

या तरुणाला झालेल्या जखमा इतक्या गंभीर होत्या की, डॉक्टरांच्या मते हे त्यांच्या हॉस्पिटलमधील सर्वात कठीण प्रकरणांपैकी एक होतं. त्यांच्या शरीरात अनेक ठिकाणी फ्रॅक्चर्स होते, उजवा हात पूर्णपणे चिरडला गेला होता. तेथील रक्तपुरवठा बंद झाला होता आणि सर्वात भीषण म्हणजे त्याच्या शरीरातील मुख्य रक्तवाहिनी फुटली होती. अशा परिस्थितीत काही मिनिटांतच त्याचा मृत्यू होण्याची शक्यता होती. त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्णाला सुमारे एक आठवडा आयसीयूमध्ये व्हेंटिलेटर सपोर्ट देण्यात आलं होतं. डॉक्टरांच्या प्रयत्नाने त्याला जीवदान मिळाले.

## इतवाऱ्यात इमारत खचली

नागपूर : राज्यात सर्वदूर पाऊस पडत आहे. पण या पावसात आता संकटं देखील उभे राहताना दिसत आहेत. नागपूरात दोन दिवसांपूर्वी गीतांजली टॉकीजजवळ एका इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना ताजी असतानाच आज अशीच काहीशी घटना समोर आली आहे. गीतांजली टॉकीजजवळ घडलेल्या घटनेत एका व्यक्तीचा जीव गेला होता. तसेच चारचाकी आणि दुचाकी वाहनांचं मोठं नुकसान झालं होतं. या घटनेतून धडा शिकून नागपूर महापालिकेकडून आता सर्वोतोपरी काळजी घेतली जात आहे. असं असताना आज एक अनपेक्षित घटना घडली. नागपूरच्या इतवारी परिसरात जीर्ण झालेल्या इमारतीचा काही भाग खचल्याची घटना घडली.

## बीएसएनएल चा 'प्लॅन'

मुंबई : जिओ आणि एअरटेलला टक्कर देण्यासाठी इछछङ चा 'सुपर स्टार' ब्रॉडबँड प्लॅन बाजारात धुमाकूळ घालत आहे. हाय-स्पीड इंटरनेट आणि भरघोस डेटा देणाऱ्या या प्लॅनचे सर्वात मोठे फीचर्स म्हणजे डेटा संपल्यावरही स्पीड कमी होत नाही. घरबसल्या चित्रपट आणि वेब सीरिज पाहणाऱ्यांसाठी यासोबत फ्री जढढ सबस्क्रिप्शनही दिले जात आहे.

सरकारी भारतीय टेलिकॉम कंपनी भारत संचार निगम लिमिटेड (इछछङ) आपल्या ग्राहकांना 'सुपर स्टार' प्लॅन ऑफर करत आहे. इछछङ चा देशातील सर्वात मोठा होम ब्रॉडबँड व्यवसाय आहे. खरं तर, तो एकेकाळी ब्रॉडबँडचा राजा देखील होता. आता इछछङ भारती एअरटेल आणि रिलायन्स जिओसारख्या कंपन्यांकडून आपला गमावलेला बाजारातील हिस्सा परत मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे.

## ऑनलाईन फसवणूक

नाशिक : सेवानिवृत्तीनंतर निवांत आयुष्य जगत असताना सोशल मीडियावर आलेली एक फ्रेंडशिप रिक्वेस्ट आयुष्यभराची कमाई गमावण्याचे कारण ठरली. फेसबुकवर झालेली ओळख, व्हॉट्सपवर वाढलेली मैत्री आणि त्यानंतर 'नंबर ट्रेडिंग'मधून भरघोस नफा मिळवून देण्याचे आमिष... या सगळ्या जाळ्यात अडकलेल्या नाशिकमधील एका सेवानिवृत्त व्यक्तीसह तिघांची तब्बल ३७ लाख ९१ हजार ३६४ रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

तक्रारीच्या आधारे पोलिसांनी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३१८(४), ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० मधील कलम ६६(क) आणि ६६(ड) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. फसवणुकीसाठी वापरण्यात आलेले व्हॉट्सप क्रमांक, यूपीआय आयडी आणि ज्या बँक खात्यांमध्ये पैसे वर्ग करण्यात आले.

# थलपती विजय यांचे सरकार २ महिन्यांतच पाडण्याचा कट?

वृत्तसंस्था

चेन्नई : दक्षिण भारतातील तामिळनाडू राज्यातून सध्या एक मोठी बातमी समोर येत आहे. राज्यातील गुप्तचर विभागाने एका मोठ्या राजकीय कटाचा पर्दाफाश केला आहे. या कटानुसार, अभिनेते ते नेते बनलेल्या थलपती विजय यांच्या 'टीव्हीके' पक्षाचे नवे कोरे सरकार पाडण्याचा प्लॅन होता. विशेष म्हणजे या सरकारला स्थापन होऊन अजून दोन महिनेही पूर्ण झालेले नाहीत. गुप्तचर विभागाच्या माहितीनुसार, च्या १५ आमदारांना एकाच वेळी राजीनामा द्यायला लावून सरकार अल्पमतात आणणे आणि ते पाडणे, असा या कटाचा मुख्य उद्देश होता.उथंगरई येथील ढतघ आमदार एन. इलैयाराजा यांनी पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर हा खळबळजनक खुलासा झाला. विधानसभा अध्यक्ष जेसीडी प्रभाकर यांच्याविरोधात अविश्र्वास प्रस्ताव आणण्यासाठी एका कन्सल्टन्सी फर्मच्या (खझऊ्ड) व्यक्तीने आपल्याला ३५ कोटी रुपयांची मोठी लाच देऊ केल्याचा आरोप आमदारांनी केला आहे. इतकेच नाही तर तोंड बंद ठेवण्यासाठी त्यांना धमकावण्यातही आले होते. ही बातमी समोर आल्यानंतर तामिळनाडूच्या राजकारणात प्रचंड खळबळ उडाली आहे.या हाय-प्रोफाइल प्रकरणात आतापर्यंत तीन जणांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्या लोकांचे धागेदोरे डीएमके (उ्रचघ) सरकारचे माजी मंत्री आणि आमदार सेंथिल बालाजी आणि त्यांचा भाऊ अशोक यांच्याशी जुळलेले असल्याचा दावा केला जात आहे. ढतघ आमदाराच्या तक्रारीवरून कारवाई करत अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला आणि खझऊ्ड कन्सल्टन्सी फर्मच्या एका कर्मचाऱ्याला अटक केली. तपासादरम्यान अधिकाऱ्यांना डीएमके आमदार सेंथिल बालाजी यांच्याशी संबंधित धागेदोरे मिळाले. त्यानंतर आणखी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांची चौकशी सुरू आहे. 'एनडीटीव्ही'च्या रिपोर्टनुसार, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्यांपैकी एक जण सेंथिल बालाजी आणि त्यांच्या भावाचा अत्यंत जवळचा आहे.या प्रकरणावर ढतघ सरकारचे मंत्री सीटी निर्मल कुमार यांनी थेट हल्लाबोल केला आहे. या कटात 'करूर गँग'चे लोक थेट सामील असल्याचा आरोप त्यांनी केला असून डीएमकेवर निशाणा साधला आहे. कुमार म्हणाले, सेंथिल बालाजी यांच्याशी थेट संबंधित असलेले आणि तथाकथित 'करूर गँग'चे लोक या प्रकरणात थेट गुंतलेले आहेत. पोलिसांनी कायदेशीर कारवाई करून यात सामील असलेल्या सर्वांना अटक करावी.



# अमरनाथ शिवलिंग वितळले; उंची ८ फुटांवर

वृत्तसंस्था

जम्मू : समुद्रसपाटीपासून सुमारे १४ हजार ५०० फूट उंचीवर असलेल्या अमरनाथ गुहेतील बर्फापासून बनलेल्या शिवलिंगाची उंची दोन महिन्यांपूर्वी २० ते २२ फूट होती. मात्र, सध्या ती केवळ ८ फुटांवर आली आहे.

मूळ शिवलिंगाची जाड भाग जो असतो, त्याची उंची ६ ते ८ फूट इतकी असते. पण त्यावर गोठलेल्या बर्फाची काही काठी वरपर्यंत गेलेली दिसते.स्थानिक लोक त्यालाही शिवलिंगाचा भाग मानतात. त्यामुळे त्याची उंची धरली तर ही उंची साधारण दोन महिन्यांपूर्वी २० ते २२ फूट इतकी होती. पण आता ती ७ ते ८ फुटांवर आली आहे. गेल्या काही वर्षांपासून श्रावण पौर्णिमेपूर्वीच शिवलिंग पूर्णपणे वितळून जात असल्याचे दिसते. वाढते जागतिक तापमान, हवामानातील बदल आणि यात्राकाळात गुहेत पोहोचणाऱ्या लाखो भाविकांमुळे परिसरातील तापमान वाढत असल्याने हिमलिंग वितळण्याचा वेग वाढत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. यापूर्वी २०१३, २०१६ आणि २०१८ या वर्षातही शिवलिंग नियोजित यात्रा संपण्यापूर्वीच नाहीसे झाले होते. विशेषतः २०१६ मध्ये यात्रा सुरू झाल्यानंतर अवघ्या दहा दिवसांत शिवलिंगाची उंची दीड फुटांवर आली होती.



यंदाची अमरनाथ यात्रा ३ जुलैपासून सुरू होणार असून, पहिला अधिकृत जत्था २ जुलै रोजी जम्मूमधील भगवतीनगर येथील यात्री निवासातून रवाना होणार आहे. विविध राज्यांतील भाविक जम्मूमध्ये दाखल होऊ लागले असून, सुरक्षा कारणास्तव सरस्वती धाम आणि वैष्णवी धाम येथे सर्वसामान्यांच्या प्रवेशावर तात्पुरती निर्बंध घातले आहेत. सुरक्षा यंत्रणा आणि भारतीय सैन्यावर पूर्ण विश्र्वास असल्याचे अनेक भाविकांनी स्पष्ट केले.

# विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर



तभा वृत्तसेवा

मुंबई : विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी शिवसेनेचे आमदार सचिन अहिर यांची आज एकमताने निवड करण्यात आली. या ऐतिहासिक क्षणानंतर सभागृहात सादर झालेल्या अभिनंदन प्रस्तावावर बोलताना भारतीय जनता पक्षाचे गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी सचिन अहिर यांचे भरभरून कौतुक केले. विद्यार्थी चळवळ आणि महाविद्यालयीन निवडणुकांपासून सुरू झालेला एक जुना, हुशार मित्र आज विधिमंडळाच्या सर्वोच्च सभागृहाच्या उपसभापती पदावर विराजमान होत आहे, हा माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे, अशा भावना आमदार दरेकर यांनी यावेळी व्यक्त केल्या.

सचिन अहिर यांच्या बहुआयामी नेतृत्वाचा उल्लेख करताना आमदार प्रवीण दरेकर म्हणाले की, महाराष्ट्रात असे एकही क्षेत्र नाही, जिथे सचिन अहिर यांनी आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटवला नाही. त्यांची विधिमंडळातील कारकीर्द अत्यंत संस्मरणीय राहिली असून, त्यांनी विधानसभा आणि विधान परिषद अशा दोन्ही सभागृहांचा गाढा अनुभव घेतला आहे. यापूर्वी म्हाडाचे अध्यक्ष आणि राज्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री म्हणून त्यांनी केलेले काम संपूर्ण महाराष्ट्राने आणि विधिमंडळाने जवळून पाहिले आहे. क्रिकेट जगतात ज्याप्रमाणे सचिन तेंडुलकर अष्टपैलू आहे, तसेच राजकारणात सचिन अहिर हे एक अष्टपैलू नेते आणि तितकेच तत्पर कार्यकर्ते आहेत, अशा शब्दांत दरेकरांनी त्यांच्या कामाची तुलना केली. कामगार क्षेत्रासह सहकार, सामाजिक आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांनी नेहमीच अग्रेसर भूमिका घेतली आहे.

# राज्यात 'सर्पविष बँक' स्थापन होणार : आबिटकर

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात सर्पदंश आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंचे प्रमाण रोखण्यासाठी त्याला 'नोटिफाईड डिसिज' (अधिसूचित आजार) म्हणून घोषित करण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे पाठवला जाणार आहे. यासोबतच महाराष्ट्रातील सापांच्या प्रजातींनुसार अचूक लस विकसित करण्यासाठी हाफकिन संस्था, वनविभाग आणि इतर संबंधित यंत्रणांची बैठक घेऊन राज्यात 'रिजनल व्हेनम बँक' (प्रादेशिक सर्पविष बँक) स्थापन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाईल, अशी घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी विधानसभेत केली. या प्रक्रियेसाठी केंद्रातील तज्ज्ञांनाही पाचारण केले जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.विधानसभेत आमदार विक्रम पाचपुते यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून राज्यातील सर्पदंशाच्या घटना, वाढते मृत्यू आणि सर्पदंशरोधी लसींमधील सुधारणांचा मुद्दा उपस्थित केला होता. या चर्चेत आमदार श्र्वेता महाले, अर्जुन खोतकर आणि जयंत पाटील यांनीही सहभाग घेतला. आमदार विक्रम पाचपुते म्हणाले, राज्यात चार प्रमुख प्रकारचे विषारी साप आढळतात. प्रत्येक सापाचे विष हे हेमोटॉक्सिन (रक्ताभिसरण संस्थेवर परिणाम करणारे), न्यूरोटॉक्सिन (चेतासंस्थेवर परिणाम करणारे) आणि कायटोटॉक्सिन (कोशिकांवर परिणाम करणारे) अशा वेगवेगळ्या प्रकारांत मोडते. मात्र, साप कोणताही चावला तरी सध्या एकच 'पॉलिव्हॅलंट' (बहुविध) लस दिली जाते. परिसर बदलला की सापाची प्रजाती आणि त्याच्या विषाची तीव्रता बदलते. चेन्नईतील नाग आणि महाराष्ट्रातील नाग यात फरक आहे.परंतु, आपल्याकडे फक्त चेन्नईच्या सर्पविषापासून तयार केलेल्या लसी वापरल्या जातात. त्यामुळे राज्यात 'पॉलिव्हॅलंट'ऐवजी 'मोनोव्हॅलंट' (विशिष्ट प्रजातीसाठी एकच) लस तयार करण्यासाठी 'रिजनल व्हेनम बँक' उभारण्यात यावी. सर्पदंशाला 'पॅनडेमिक' (महामारी) घोषित करणार का, अशी विचारणाही पाचपुते यांनी केली.आमदार श्र्वेता महाले यांनी सांगितले की, शेतकरी आणि शेतमजूर मोठ्या संख्येने सर्पदंशाचे बळी ठरत आहेत. ग्रामीण रुग्णालयांमध्ये लसींचा पुरेसा साठा नसतो आणि तिथे आयसीयू सुविधाही उपलब्ध नसते. त्यामुळे सरकारने सर्पदंश प्रतिबंधासाठी स्वतंत्र आणि ठोस धोरण जाहीर करावे, अशी मागणी त्यांनी केली.



# मुंबईतील नागरिकांच्या तक्रारीत ५९ टक्के वाढ

तभा वृत्तसेवा

मुंबई : मुंबईतील नागरिकांना विविध सेवा पुरविणाया महापालिकेने सर्व सेवांमध्ये आघाडी घेतली आहे. मात्र तक्रारींमध्ये ५९ टक्क्यांची वाढ झाली आहे. यात पर्यावरणसंबंधीच्या ५३१ टक्के आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या २८१ टक्के तक्रारी महापालिका प्रशासनाकडे दाखल झाल्या आहेत.सन २०१६ मध्ये असलेल्या ८१,५५५ तक्रारींची संख्या २०२५ मध्ये १,३०,०६६ वर पोहोचली असल्याचा प्रजा फाऊंडेशनचा अहवाल ३० जून रोजी प्रेस क्लब येथे पत्रकार परिषदेत प्रसिद्ध करण्यात आला. परिणामी, नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यात महापालिका प्रशासन अपयशी ठरल्याचे अहवालातून दिसून येते.प्रजा फाउंडेशनने मनपाच्या सहकार्याने तयार केलेल्या मुंबईतील नागरी सेवा, पर्यावरण व हवामान बदलाचे मुद्दे २०२६ या अहवालाचे मंगळवारी प्रकाशन झाले. यामध्ये मुंबईतील नागरी सेवांची स्थिती, पर्यावरणीय कामगिरी व हवामान बदलाला समोरे जाण्याच्या शहराच्या तयारीचे सर्वंकष मूल्यमापन करण्यात आले.गेल्या दशकभरात मुंबईने अनेक नागरी सेवा पुरवठ्यांमध्ये लक्षणीय सुधारणा केली आहे. शहरातील कचरा निर्मितीमध्ये २७ टक्के घट झाली आहे. घराघरातून कचरा संकलनाचे प्रमाण ८० टक्केवरून १०० टक्केपर्यंत वाढले आहे. तसेच कचरा वर्गीकरणाचे प्रमाण २७ टक्क्यावरून ८६ टक्केपर्यंत तर शास्रोक्त पद्धतीने कचरा विल्हेवाट लावण्याचे प्रमाण ३० टक्केवरून ८८ टक्केपर्यंत वाढले आहे. परिणामी शहरातील घनकचरा व्यवस्थापन अधिक सक्षम होत असल्याचे आकडेवारीतून दिसून येत आहे.यावेळी प्रजा फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद म्हस्के म्हणाले की, मुंबई महापालिकेच्या सेवेत काही सुधारणा झाल्या असल्या, तरी अनेक मुलभूत दीर्घकालीन आव्हानेही आहेत.

# व्हेनेझुएलाच्या समुद्रात भारतीय खलाशासोबत घातपात?

वृत्तसंस्था

लखनौ नऊ : व्हेनेझुएलात जहाजावरील ड्युटी दरम्यान राकेश चौहान यांचा संशयास्पद शेवट झाला. नोव्हेंबर २०२५ मध्ये फिटर म्हणून काम सुरू करणाऱ्या राकेश यांचा ७ मे रोजी मृत्यू झाला. यानंतर ४ जूनला त्यांचं शव घरी आणण्यात आलं. आधी अपघात, मग हृदय विकाराचा झटका आल्यातं सांगणाऱ्या शिपिंग कंपनीनं नातेवाईकांना न सांगता शवविच्छेदन प्रक्रिया करुन घेतली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशावरुन पुन्हा शवविच्छेदन करण्यात आलं. त्यात राकेशच्या शरीरातील सर्व महत्त्वाचे अवयव गायब असल्याचं स्पष्ट झालं. त्यामुळे या प्रकरणातील संशय वाढला आहे. राकेश चौहान मूळचे उत्तर प्रदेशच्या देवरिया जिल्ह्याचे रहिवासी होते. भलुअनीत भगवानपूरात त्यांचं कुटुंब वास्तव्यास आहे. '७ मे रोजी आम्हाला फोन आला होता. राकेश जहाजावर पडल्यानं त्याला दुखापत झाली असल्याचं सांगण्यात आलं. पण पुढच्याच दिवशी कंपनीनं हृदय विकाराचा झटका आल्याचं सांगितलं,' अशी माहिती राकेश यांचे वडील रामदेव चौहान यांनी दिली.राकेश यांची पत्नी रंजना आणि वडील मुंबईस्थित कंपनीच्या कार्यालयात पोहचले. आठवड्याभरात राकेश यांचं पार्थिव घरी पाठवण्यात येईल, असं त्यांना सांगण्यात आलं. महिन्याभरानंतर ४ जूनला राकेश यांचं शव देवरियाला पोहोचलं. पण कंपनीनं मृत्यूमागील नेमकं कारण किंवा आधी करण्यात आलेल्या शवविच्छेदनाची कोणतीही लेखी माहिती कुटुंबाला दिली नाही.घरी पोलिसांच्या उपस्थितीत डॉक्टरांनी आधीच शवविच्छेदन झालं असल्याचं सांगून पुन्हा शवविच्छेदन करण्यास नकार दिला. यानंतर जिल्हाधिकारी मधुसूदन हुलगी यांच्या आदेशावरुन डॉक्टरांनी पुन्हा शवविच्छेदन केलं. तेव्हा त्यांना धक्काच बसला. राकेश यांच्या शरीरातील किडनी, हृदय, फुफ्फुसासह २१ अवयव गायब होते. व्हिसेरा सुरक्षित ठेवण्यासाठी शरीरात काही शिल्लकच राहिलेलं नव्हतं. त्यामुळे डॉक्टरांना त्यांच्या मृत्यूचं नेमकं कारण सांगणं अवघड झालं. विमा कंपनीकडून मोठी रक्कम पदरात पाडून घेण्यासाठी आणि पुरावे मिटवण्यासाठी हा प्रकार करण्यात आल्याचा आरोप राकेश यांचे सहकारी घनश्याम सिंह आणि कुटुंबियांनी केला. राकेश यांची हत्या करुन त्यांच्या अवयवांची तस्करी करण्यात आल्याचा संशय कुटुंबाला आहे. पीडित कुटुंबाकडून आता न्यायाची मागणी केली जात आहे. दोषींविरोधात कठोर कारवाई व्हावी आणि आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी कुटुंबानं केली आहे. यासाठी पीडित कुटुंब भारतीय दूतावासाच्या संपर्कात आहे.






# महाराष्ट्राला पाऊस झोडपणार, ६ जिल्ह्यांना रेड अलर्ट

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात यंदा उशिरा मान्सून सक्रिय झाल्याने सर्वांनाच पावसाची ओढ लागली होती. अखेर आता जूनअखेरीस राजधानी मुंबईसह राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली असून पुढील काही दिवसांत पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. कोकणातील जिल्ह्यांमध्ये बहुतांश ठिकाणी मुसळधार पाऊस किंवा मेघगर्जनेसह पावसाची दाट शक्यता असल्याचं हवामान कात्याने सांगितलं आहे. तसंच राज्यातील एकूण सहा जिल्ह्यांना रेड अलर्ट देण्यात आला आहे.



हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मुंबईत पुढील पाच दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असून शहराला पाच दिवसांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. शहरात पहिल्याच मोठ्या पावसात सखल भागांमध्ये पाणी साचून काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालेलं असतानाच आता पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आल्याने मुंबईकरांना कामानिमित्त बाहेर पडताना विशेष खबरदारी घ्यावी लागणार आहे.

रत्नागिरी जिल्ह्याला बुधवारी आज रेड अलर्ट जारी करण्यात आला होता . त्यासोबतच पालघर जिल्ह्याला २ जुलै रोजी, ठाणे जिल्ह्याला ४ जुलै रोजी, रायगड जिल्ह्याला ३ जुलै आणि ४ जुलै रोजी, सातारा जिल्ह्यातील घाट परिसराला ५ जुलै, तर पुणे जिल्ह्यातील घाटपरिसरात २ जुलै, ३ जुलै आणि ४ जुलै या कालावधीसाठी रेड अलर्ट जारी करण्यात आला. या कालावधीत सदर जिल्ह्यांमध्ये अतिमुसळधार पाऊस कोसळण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये बहुतांश ठिकाणी आणि उत्तर महाराष्ट्रातील काही ठिकाणी आज मध्यम स्वरुपाच्या तसेच मेघगर्जनेसह पावसाची दाट शक्यता आहे. तर दक्षिण महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये अनेक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस कोसळू शकतो, असा अंदाज प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवला आहे.

दरम्यान, उशिरा का होईना समाधानकारक पावसाचे आगमन झाल्याने बळीराजा सुखावला असून पेरणीच्या कामाला वेग येणार आहे.

# AI चा गेम ओव्हर? ७९ टक्के डेटा सेंटर्ससमोर ब्लॅकआऊटचं संकट !

तभा वृत्तसेवा

मुंबई : उकाडा वाढल्यानं देशभरातील जनता त्रस्त झाली. भीषण उष्णतेमुळे युरोपपासून अमेरिकेतील कोट्यवधी लोक त्रासले आहेत. पण उष्णतेमुळे केवळ माणूसच नव्हे, तर एआयच्याही अडचणी वाढल्या आहेत. भीषण उष्णतेमुळे बड्या कंपन्यांची अनेक एआय डेटा सेंटर्स उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहेत. या सेंटर्सना थंडगार ठेवण्याचं आव्हान कंपन्यांसमोर आहे. उष्णतेमुळे निर्माण होणाऱ्या अडचणींमधून मार्ग काढण्यासाठी मायक्रोसॉफ्ट आणि एनवीडिया यासारख्या कंपन्यांनी डेटा सेंटरच्या डिझाईनमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला आहे. डेटा सेंटर्स प्रत्येक ऋतूत थंड ठेवण्यासाठी या कंपन्या कामाला लागल्या आहेत. वाढलेला उकाडा आणि वातावरणात होणारे बदल यामुळे एआय डेटा सेंटर उभारणाऱ्या कंपन्यांचा खर्च कैकपटीनं वाढला आहे.एआय डेटा सेंटर्समध्ये अतिशय शक्तिशाली चिपचा वापर होतो. त्या चिप थंड ठेवणं हे मोठं आव्हान आहे. डेटा सेंटर्स कित्येक लाख लीटर पाणी पितात. डेटा सेंटर्स थंड राहिल्यास ती भस्मसात होऊ शकतात. कारण सेंटर्समध्ये वापरल्या जाणाऱ्या चिप अतिशय वेगानं गरम होतात. त्यांना कार्यान्वित ठेवण्यासाठी प्रचंड प्रमाणात वीज लागते. एका डेटा सेंटरला लागणारी वीज लाखो घरांमध्ये लागणाऱ्या वीजेइतकी आहे. त्यामुळे भीषण उकाड्यामुळे ब्लॅकआऊटचं संकट निर्माण होण्याचा धोका आहे. डेटा सेंटरमध्ये वापरल्या जाणाऱ्या विजेचा ४० टक्के भाग केवळ चिप्स थंड ठेवण्यासाठी उपयोगात आणला जातो. वाढतं तापमान, हवामान बदल यामुळे डेटा सेंटर्सची विजेची मागणी वाढली आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये शहरी भागांमध्येही विजेची मागणी वाढते. त्यामुळे पॉवरग्रिडकडे डेटा सेंटर्ससाठी पुरेशी वीज शिल्लक राहत नाही. काही दिवसांपूर्वीच इटलीच्या ट्युरिन शहरात तापमान ३८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचलं. त्यामुळे जमिनीखाली टाकण्यात आलेल्या केबल गरम झाल्या. अनेकदा ब्लॅकआऊट झालं. वाढलेल्या उकाड्यामुळे विजेची मागणी कैकपटीनं वाढली आहे. त्यामुळे डेटा सेंटर्सला पुरेसा विद्युत पुरवठा होत नाही.झ्युरिच इंश्युरन्सच्या अहवालानुसार, सध्याच्या घडीला जगातील ७९ टक्के डेटा सेंटर्ससमोर हवामानातील बदलांमुळे निर्माण झालेल्या संकटांचा धोका आहे. केवळ उकाड्यामुळेच नव्हे, तर सोसाट्याच्या वाऱ्यांमुळेही डेटा सेंटर्सचं नुकसान होतं. त्यामुळे टेक कंपन्यांसमोर मोठी आव्हानं उभी राहिली आहेत. यावर्षी ६४ टक्के कंपन्यांनी त्यांची डेटा सेंटर्स ग्रामीण भागात आणि दूरवर स्थलांतरित केली आहेत. पण या परिसरांमध्ये डेटा सेंटर्सना वेगळ्या धोक्यांचा सामना करावा लागत आहे. कुठे सोसाट्याचा वारा, गारांचा पाऊस यामुळे डेटा सेंटर्सचे कूलिंग टॉवर उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळे डेटा सेंटर्स थंड ठेवणं अतिशय आव्हानात्मक आहे.



सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पैठण बसस्थानकातील दुकान फोडून चोरी

तभा वृत्तसेवा



पैठण दि ०१ :- प्रवाशांच्या वर्दळीने नेहमी गजबजलेल्या पैठण बसस्थानकातील दुकान फोडून रोख रक्कम आणि साहित्य चोरीची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली.या घटनेची नोंद पैठण पोलिसात करण्यात आली आहे.सीसीटीव्ही आणि सुरक्षा रक्षकांचा पहारा असून ही बसस्थानकातील दुकान फुटल्याने व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली आहे.

पैठण बस स्थानक एसटी महामंडळ उपहार गृहाला चिटकून प्रफुल्ल सावजी यांचे दुकान असून या दुकानात स्टेशनरी तसेच इतर साहित्य मिळायचे बुधवार सकाळी सावजी हे नेहमीप्रमाणे दुकान उघडण्यासाठी आले असता त्यांना दुकानाचे कुलूप तुटलेले तसेच दरवाजा उचल उचकटलेला निदर्शनास आले यावेळी त्यांनी दुकान खोलून पाहिले असता त्यातील साहित्य आणि रोख रक्कम चोरीला गेल्याने सावजी यांनी पैठण पोलिसात दुकान फोडून चोरी झाल्याची तक्रार दिली आहे. बस स्थानक बाहेरील एका कापड रेडिमेड दुकान फोडण्याचा प्रयत्न ही केल्याचे बोलले जाते . गजबजलेल्या ठिकाणी दुकान फोडून झालेल्या या चोरीच्या घटनेने पैठण शहरात व्यापारी वर्गात एकच खळबळ उडाली असून या ठिकाणी व्यापारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी भेटी दिल्या.

# शहराची सकारात्मक प्रतिमा घडविण्यासाठी कंटेंट क्रिएटर्सनी पुढे यावे : महापौर समीर राजूरकर

## 'कॉफी विथ मेयर' उपक्रमात सोशल मीडिया क्रिएटर्स, ब्लॉगर्सशी संवाद

तभा वृत्तसेवा



छत्रपती संभाजीनगर : शहराचा विकास केवळ रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून नागरिकांचे नागरिकशास्त्र, सामाजिक जाणीव, संस्कृती आणि शहराविषयीची आपुलकीही तितकीच महत्त्वाची आहे. छत्रपती संभाजीनगरची देश-विदेशात सकारात्मक आणि विश्वासार्ह ओळख निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमांसह समाजमाध्यमांवरील कंटेंट क्रिएटर्सनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन महापौर समीर राजूरकर यांनी केले.

महापौर समीर राजूरकर यांच्या संकल्पनेतून स्मार्ट सिटी कार्यालयात 'कॉफी विथ मेयर' या संवादात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शहरातील सुमारे १०० सोशल मीडिया कंटेंट क्रिएटर्स, ट्रॅव्हल ब्लॉगर्स, कॉमेडी क्रिएटर्स तसेच विविध डिजिटल माध्यमांशी संबंधित प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

यावेळी बोलताना महापौर राजूरकर म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरची खरी ओळख त्याच्या समृद्ध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पर्यटन वारशामुळे आहे. शहरातील पर्यटनस्थळे, ऐतिहासिक वास्तू आणि सांस्कृतिक वैभवाची सकारात्मक माहिती समाजमाध्यमांच्या माध्यमातून देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज आहे. यामुळे शहराची प्रतिमा उंचावण्यास आणि पर्यटनाला चालना मिळण्यास मदत होईल.

कार्यक्रमात शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नागरिकांचा सहभाग, स्वच्छता, वाहतूक शिस्त, पर्यटन विकास, सांस्कृतिक वारशाचे जतन तसेच डिजिटल माध्यमांची जबाबदारी या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. सहभागी कंटेंट क्रिएटर्स आणि ब्लॉगर्स यांनी शहराच्या विकासासंदर्भातील विविध सूचना आणि अपेक्षा मांडल्या. महापौरांनी त्या लक्षपूर्वक ऐकून सकारात्मक प्रतिसाद देण्याचे आश्वासन दिले.

शहर अधिक स्वच्छ, सुंदर, विकसित आणि जागतिक स्तरावर सकारात्मक ओळख मिळविण्यासाठी नागरिक, प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांवरील कंटेंट क्रिएटर्स यांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे महापौर समीर राजूरकर यांनी यावेळी नमूद केले.

# हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांना मनपाकडून अभिवादन


## मंत्री अतुल सावे, महापौर समीर राजूरकर यांची उपस्थिती



तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : हरित क्रांतीचे प्रणेते तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने बुधवारी त्यांना अभिवादन करण्यात आले. सिडको बसस्थानक परिसरातील वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास राज्याचे ओबीसी व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे आणि महापौर समीर राजूरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, नगरसेवक प्रमोद राठोड, बालाजी मुंढे, गणेश नावंदर, रामेश्वर भादवे, सुरेखा सानप, मनपा आयुक्त अमोल येडगे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे, अपर्णा थेटे, मुख्य उद्यान अधीक्षक विजय पाटील, माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर, संतोष कोठाळे तसेच महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये डॉक्टर्स डे साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन, दि. १ जुलै : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये आज (दि. १ जुलै) राष्ट्रीय डॉक्टर्स डे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानदेवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी शाळेच्या शिक्षिका जोस्तना तोडमल यांनी राष्ट्रीय डॉक्टर्स डेचे महत्त्व, वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांचे समाजासाठी असलेले अनमोल योगदान तसेच आरोग्यसेवेत त्यांच्या निस्वार्थ कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी डॉक्टर्स डे निमित्त प्रभावी भाषणे सादर केली. तसेच डॉक्टरांच्या सेवाभावी कार्यावर आधारित आकर्षक नृत्य सादर केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये डॉक्टरांविषयी आदर, कृतज्ञता आणि समाजसेवेची भावना रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसंतराव नाईक जयंतीनिमित्त मनपाकडून 400 देशी वृक्षांचे वृक्षारोपण

## मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन रोड परिसरात उपक्रम; वृक्षसंवर्धनासाठी फेन्सिंग उभारणार

तभा वृत्तसेवा



छत्रपती संभाजीनगर : हरित क्रांतीचे जनक तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने मुकुंदवाडी रेल्वे स्टेशन रोडवरील शिवाजीनगर ते रामनगर या रस्त्यालगत ४०० देशी वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाला.

या कार्यक्रमाला नगरसेवक प्रमोद राठोड, बालाजी मुंडे, मनपा आयुक्त अमोल येडगे, शहर अभियंता संजय कोंबडे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे, अपर्णा थेटे, मुख्य उद्यान अधिकारी डॉ. विजय पाटील तसेच महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धन आणि परिसराचे सुशोभीकरण या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात भारतीय वंशाच्या सुमारे ४०० वृक्षांची लागवड करण्यात आली. शहरातील हरित क्षेत्र वाढविण्यासोबतच नागरिकांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्याचाही या उपक्रमामागील उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

वृक्षांचे संरक्षण आणि संवर्धन सुनिश्चित करण्यासाठी संबंधित रस्त्यालगत लवकरच फेन्सिंग उभारण्यात येणार आहे. त्यामुळे कचरा टाकणे आणि अतिक्रमणाला आळा बसण्यास मदत होणार असून लावण्यात आलेल्या वृक्षांचे संगोपन अधिक प्रभावीपणे करता येईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारत पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# शेतीमित्र पत्रकार विजय चौधरी यांचा सन्मान, खुलताबाद पंचायत समितीत कृषी दिन साजरा



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी दि १ : पंचायत समिती खुलताबाद व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त पंचायत समिती सभागृहात कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरात करण्यात आला. वसंतराव नाईक यांच्या प्रतिम पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी तालुक्यातील कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या प्रगतिशील शेतकरी, महाराष्ट्र शासनाकडून पुरस्कार प्राप्त सन्मानित शेतकरी व कृषी विषयक उत्कृष्ट लिखाण केल्याबद्दल वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार विजेते पत्रकार विजय चौधरी यांचा यावेळी पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती सुनीता खंडागळे या होत्या तर उपसभापती मंदाताई वाकळे, गटविकास अधिकारी प्रकाश नाईक सदस्य सुरेश जाधव, योगिता बरडे, प्रकाश चव्हाण, विकास कापसे, बद्रीनाथ वाकळे, नारायण बरडे,, सहाय्यक गट विकास अधिकारी गिरीश सोनार, तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे, कृषी अधिकारी हनमंत बोयनर, प्रतिभा कांबळे मयूर पाटील उपस्थित होते.

# फारोळा ग्रामपंचायत कृषी सप्ताह आयोजन



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि पैठण तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय फारोळा ग्रामपंचायत येथे प्रशासक सलीम महमंद पठाण यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री हरितक्रांतीचे प्रणेते स्व.वसंतरावजी नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करून ग्रामसभा घेऊन कृषी सप्ताह चे उद्घाटन करण्यात आले. व्याख्यान देऊन शेतकऱ्यांचे स्वागत करण्यात आले.यावेळी उपस्थित ग्रामपंचायत अधिकारी .ए.एस.तुपे,सांडु धुमाळ, शिवाजी गोरे,असलम पठाण, रविंद्र गोरे, इस्माईल पठाण, दिलीप गोरे, गणेश गायकवाड, तेजस जाधव, संजय धुमाळ, रविंद्र पवार, मंगेश धुमाळ रेखा इंदापुरे ग्रामस्थ,मोठ्या संख्येने महिला गावकरी आदींची उपस्थित होते.

# सिल्लोड येथे भा.ज.प.च्या नव्या कार्यालयाचा रावसाहेब दानवे यांच्या हस्ते उद्घाटन

## सुहास सिरसाट व इद्रिस मुलतानी यांचा नागरी सत्कार

सिल्लोड, दि. १ जुलै : भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक विस्ताराला आणि कार्यकर्त्यांच्या बळकटीला नवे अधिष्ठान देणाऱ्या सिल्लोड येथील नव्या भाजपा कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा गुरुवार, दि. २ जुलै २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांसाठी तसेच सिल्लोड शहरातील नागरिकांसाठी विशेष आकर्षणाचा ठरणार आहे.

या नव्या कार्यालयाचे उद्घाटन भारत सरकारचे केंद्रीय राज्यमंत्री मा. रावसाहेब पाटील दानवे यांच्या शुभहस्ते होणार असून, कार्यक्रमाला भारतीय जनता पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विधानपरिषदेवर नवनिर्वाचित सदस्य मा. सुहास सिरसाट यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या पसमांदा मुस्लिम समाज राज्यस्तरीय अभ्यास समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती होऊन राज्यमंत्री दर्जा प्राप्त झाल्याबद्दल मा. इद्रिस मुलतानी यांचाही विशेष नागरी सत्कार करण्यात येणार आहे. दोन्ही मान्यवरांचा सन्मान हा सिल्लोड तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण मानला जात असून, या निमित्ताने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला आहे.

भाजपा कार्यालय हे केवळ पक्षाचे कार्यालय नसून कार्यकर्त्यांचे संवाद केंद्र, जनसामान्यांच्या समस्या सोडविण्याचे माध्यम आणि संघटनात्मक उपक्रमांचे प्रमुख केंद्र म्हणून कार्यरत राहणार आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून नागरिकांशी अधिक प्रभावी संवाद साधला जाईल तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

**कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवर व नागरिकांसाठी दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्थळ :** नवीन भाजपा कार्यालय, पाणी फिल्टरजवळ, जळगाव रोड, सिल्लोड.

# 'सारेगमप'च्या नव्या पर्वासाठी ऑडिशनला सुरुवात; 3 ते 5 जुलै दरम्यान वाराणसी, लखनौ व दिल्लीत निवड प्रक्रिया

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : झी टीव्हीने आपल्या लोकप्रिय संगीत रिॲलिटी शो 'सारेगमप' च्या नव्या पर्वाची घोषणा करत देशातील पुढील सिंगिंग सुपरस्टारच्या शोधाला सुरुवात केली आहे. शोचा पहिला प्रोमोही प्रदर्शित करण्यात आला असून, यंदाच्या पर्वातही अस्सल आणि मनाला भिडणाऱ्या गायकीला प्राधान्य देण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यातील ऑडिशन ३ जुलै रोजी वाराणसी, ४ जुलै रोजी लखनौ आणि ५ जुलै रोजी दिल्ली येथे होणार असून, इतर शहरांतील तारखा लवकरच जाहीर करण्यात येणार आहेत. यंदाही भव्य मंच, आकर्षक सादरीकरण आणि १०० हून अधिक लाईव्ह संगीतकारांच्या सहभागामुळे प्रेक्षकांना दर्जेदार संगीताचा अनुभव मिळणार आहे.

गेल्या तीन दशकांहून अधिक काळ 'सारेगमप'ने अनेक गुणी गायकांना देशभरात ओळख मिळवून दिली आहे. श्रेया घोषाल, कुणाल गांजावाला आणि मोनाली ठाकूर यांसारख्या अनेक कलाकारांनी याच मंचावरून आपल्या कारकिर्दीची यशस्वी सुरुवात केली.

ऑडिशनसाठी इच्छुकांनी 9152915218 या क्रमांकावर मिस्ड कॉल द्यावा किंवा 8655780787 या व्हॉट्सॲप क्रमांकावर आवश्यक माहिती व दोन ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्स पाठवाव्यात. तसेच अधिकृत पोर्टलवरूनही ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. देशातील उदयोन्मुख गायकांसाठी ही मोठी संधी असल्याचे झी टीव्हीकडून सांगण्यात आले आहे.

# नोव्हा 2 निओआणि नोव्हा 2 प्रो च्या पुढील विक्रीची घोषणा

मुंबई : एआय प्लस स्मार्टफोनने नुकत्याच लॉन्च केलेल्या नोव्हा 2 निओ आणि नोव्हा 2 प्रो च्या पुढील विक्रीची घोषणा केली आहे, कारण 26 जून रोजी फ्लिपकार्ट वर झालेल्या पहिल्या विक्रीत दोन्ही स्मार्टफोन संपूर्णपणे विकले गेले. हे उपकरणे 22 जून रोजी इंडियाज गॉट नोव्हा येथे सादर करण्यात आली — जो ब्रँडचा प्रमुख लॉन्च कार्यक्रम आहे — हा कार्यक्रम प्रसिद्ध गॅझेट गुरू राजीव मखनी यांनी सादर केला, ज्यात विनोदकार व युट्यूबर् समय रैना आणि एआय प्लस स्मार्टफोन चे सीईओ माधव शेठ उपस्थित होते.

# सॅमसंग गॅलेक्सी ए27 5जी भारतात लाँच

छत्रपती संभाजीनगर : सॅमसंगने आज गॅलेक्सी ए27 ५जी च्या लाँचची घोषणा केली आहे, जो नाविन्यता आणि तंत्रज्ञान प्रत्येकापर्यंत पोहोचवणारा स्मार्टफोन आहे. हा स्मार्टफोन तरुण वापरकर्त्यांचा विचार करून डिझाइन करण्यात आला आहे, जे विश्वासार्ह कार्यक्षमता, दीर्घकालीन सॉफ्टवेअर सपोर्ट, प्रबळ सुरक्षा आणि सोपा व सुटसुटीत सॉफ्टवेअर अनुभव देणाऱ्या डिवाईसच्या शोधात असतात. या स्मार्टफोनमध्ये स्टाइल, कार्यक्षमता आणि किफायतशीरपणाचे उत्तम संयोजन आहे.

# सोयगांव प्रकल्प अंतर्गत रिक्त अंगणवाडी मदतनीस पदांची भरती प्रक्रिया सुरु


तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ जुलै : एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत सोयगांव तालुक्यातील (प्रकल्प सोयगांव ग्रामीण अंतर्गत) असलेल्या नांदातांडा, देव्हारी,सावरखेडा,निंभोरा व तितूर या महसूली गावातील प्रत्येकी १ मदतनीस अशा एकूण ५ रिक्त असलेल्या मदतनीस पदांसाठी पदभरतीची कार्यवाही ३० जून पासून सुरू करण्यात येत आहे. सदरील भरती प्रक्रिया ही राज्य शासनाच्या शासन निर्णय दिनांक ०२ फेब्रुवारी २०२३ व दिनांक ३० जानेवारी २०२५ मधील नमूद अटी व शर्तीनुसार करण्यात येणार आहे.

मदतनीस पदासाठी शैक्षणिक पात्रता किमान १२ वी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. १२ वी पेक्षा जास्त शिक्षण पुर्ण केलेल्या अर्जदारास शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २०२५ मध्ये नमूद परिशिष्ट अ नुसार अतिरिक्त गुण देण्यात येईल अतिरिक्त गुण मिळविण्यासाठी अर्जदाराने पदवी, पदव्युत्तर पदवी, डी. एड., बी.एड. एम. एस. सी. आय. टी.अथवा शासनाने ठरविलेल्या समकक्ष संगणक परीक्षा प्रमाणपत्र उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. विधवा अथवा अनाथ , मागास प्रवर्गातील , सेविका / मिनी सेविका / मदतनीस पदाचे किमान २ वर्ष अनुभव असणाऱ्या अर्जदाराला अतिरिक्त गुण देण्यात येईल.

प्रकल्प कार्यालयाकडून पदभरती बाबत जाहिरात संबंधित महसूली गावाच्या ग्राम पंचायत कार्यालय,अंगणवाडी केंद्र, प्रकल्प कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर ३० जून रोजी प्रसिद्ध करून अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक ०१ जुलै ते १४ जुलै पर्यंत कार्यालयीन कामाचे एकूण १० दिवस (शासकीय सुटीचे दिवस वगळून) निश्चित केली आहे.तरी पद भरती असलेल्या महसुली गावातील पात्र महिला / मुलींनी अर्ज रितसर अर्ज सादर करावे असे आवाहन केले आहे. सदरील पदभरतीसाठी विहित अर्जाचा नमुना महसूली गावातील अंगणवाडी सेविका / एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय सोयगाव येथे उपलब्ध असून अर्जदाराने परिपूर्ण भरलेला अर्ज एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय ,कोर्टाच्या बाजूला सोयगांव येथे स्वतः उपस्थित राहून कार्यालयीन वेळेत सादर करावा.

# बिरबल राठोड यांचे निधन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१ जुलै : तालुक्यातील जंगलाताडा येथील बिरबल लक्ष्मण राठोड (वय.८५) यांचे दि.३० मंगळवार रोजी रात्री ७:३० वा.अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर दि.१ बुधवार रोजी सकाळी १०:०० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन मुली,सुना,नातवंडे असा परिवार आहे.सामाजिक कार्यकर्ते श्रावण राठोड यांचे ते वडील होत

# मौजे उंडणगाव येथे कृषी दिन उत्साहात साजरा

सिल्लोड प्रतिनिधी

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर पी एम मिन्नू व गटविकास अधिकारी पंचायत समिती सिल्लोड रत्नाकर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माननीय सभापती सौ अनिता ताई सुरेश बनकर यांच्या अध्यक्षतेखाली


महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा हरितक्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै रोजी मौजे उंडणगाव येथे कृषी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रगतशील शेतकरी डॉ. भवर यांनी किमान स्वतःच्या कुटुंबासाठी तरी सेंद्रिय शेती करणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच कोल्हापूर येथील कान्हेरी मठ येथे सुरू असलेल्या सेंद्रिय शेतीच्या यशस्वी प्रयोगाविषयी माहिती दिली.

डॉ. विजय चव्हाण यांनी जनावरांच्या आरोग्य व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करताना विविध चारा पिकांची लागवड, त्यांचे नियोजन व पशुपालनातील महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली.

तालुका कृषी अधिकारी डॉ. संदीप जगताप यांनी शेतीबरोबरच कुक्कुटपालन, शेळीपालन तसेच गाय-म्हैस पालन यांसारखे पूरक व्यवसाय शेतकऱ्यांनी स्वीकारणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यामुळे शेतीवरील जोखीम कमी होऊन वर्षभर उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध राहतो, असे त्यांनी नमूद केले. तसेच शेतीचा व्यवसाय उद्योगाप्रमाणे चालवून प्रत्येक खर्च व उत्पन्नाची नियमित नोंद ठेवावी, असेही त्यांनी आवाहन केले.

जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन वाघ यांनी कृषी विभागामार्फत अशा प्रकारचे शेतकरी हिताचे कार्यक्रम गावपातळीवर वारंवार आयोजित करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.



सहकार्यक्रम अधिकारी अरुण घोलप यांनी विकसित भारत अभियान व विविध शासकीय योजनांमधील नव्या बदलांची माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात पंचायत समिती सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांनी पंचायत समितीच्या उपकरातून माती परीक्षण प्रयोगशाळा (लॅब) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा केली. तसेच कान्हेरी मठासारख्या ठिकाणी शेतकरी अभ्यास सहलींचे आयोजन करण्यात येईल, असे सांगितले. सध्याच्या हवामानाचा विचार करून शेतकऱ्यांनी कमी कालावधीत येणाऱ्या पिकांची निवड करावी तसेच फळबाग लागवड व विविध शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहाय्यक गटविकास अधिकारी आशिष मस्के यांनी केले. त्यांनी स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या कृषी विकासातील योगदानाचा आढावा घेत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी (कृषी) विश्वास बनसोडे यांनी केले, तर आभार कृषी अधिकारी सुनील सूर्यवंशी यांनी मानले.

या कार्यक्रमास पंचायत समिती सभापती सौ. अनिता सुरेश बनकर, जिल्हा परिषद सदस्य डॉ. सचिन वाघ, पंचायत समिती सदस्या सौ. वृषाली मिरकर, ग्रामपंचायत प्रशासक लक्ष्मण धनवई, सुरेश बनकर, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, सहाय्यक गटविकास अधिकारी आशिष मस्के, तालुका कृषी अधिकारी डॉ. संदीप जगताप, प्रगतशील शेतकरी डॉ. भवर, माजी उपसरपंच सौ. सुनीता सुभाष लांडगे, ग्रामपंचायत सदस्य दिलीप किसन धनवई, दत्तात्रय तुकाराम बोराडे, मंडळ कृषी अधिकारी भगवान सुरडकर, गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक विनोद मोरे, कुडके, जी. बी. इंगळे तसेच तालुका कृषी कार्यालयातील उपकृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विस्तार अधिकारी (कृषी) जोगेंद्र अहिरराव, राजेंद्र लांडगे तसेच ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर बोराडे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास गावातील बहुसंख्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.

**जाहिर प्रगटन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १३०/२०२६.

अर्जदार :- १. ऊत्तम कचरु शिनगारे, वय. ६० वर्षे, धंदा, मजुरी, २. कैलास कचरु शिनगारे, वय, ६८ वर्षे, धंदा, मजुरी, ३. संतोष कचरु शिनगारे-मयत वारस :- ३अ. मिराबाई संतोष शिनगारे, वय. ४५ वर्षे, धंदा, घरकाम, ३ब. नरेंद्र संतोष शिनगारे, वय. २६ वर्षे, धंदा, मजुरी, ३क. अश्विनी संतोष शिनगारे, वय, १९ वर्षे, धंदा, घरकाम, सर्व रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३ड. वैशाली सुदाम पांढरे, वय, २४ वर्षे, धंदा, घरकाम, रा. रामगव्हाण बु., ता. अंबड, जि. जालना. ४. सुशिलाबाई दिपक पिसे-मयत वारस :- ४अ. योगेश दिपक पिसे, वय. ४३ वर्षे, धंदा. मजुरी, ४ब. राजु दिपक पिसे, वय. ४८ वर्षे, धंदा. मजुरी, दोघेही रा. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ५. वस्तलाबाई सुरेश सिदगोर-मयत वारस :- ५अ. सुरेश ताराचंद हटकर, वय. ६८ वर्षे, धंदा. मजुरी, रा. पिंपळकोठा, ता. जामनेर, जि. जळगांव. ५ब. मनिषा योगेश पाटील, वय. ३८ वर्षे, धंदा, घरकाम, रा. अंजनविहिरे, खर्डे बु., ता. शिंदखेडे, जि. धुळे. ५क.. दिलीप सुरेश हटकर, वय. ३४ वर्षे, धंदा. मजुरी, रा. फिरोज गांधीनगर, इंदौर, जि. इंदौर. चंद्रकला रामेश्वर धुलगुंडे, वय. ३६ वर्षे, धंदा. घरकाम रा. सुंदरनगर, चंदनझिरा, जालना, जि. जालना. ६.

-विरुध्द-

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत लिलाबाई कचरु शिनगारे या दि. १६/१०/२०२० रोजी मौजे. पळासखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ हे लिलाबाई कचरु शिनगारे यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :-०३/०८/२०२६. आज दि. ०१/०७/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशावरून

विभागीय लिपीक, | अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

## अग्रलेख

# टीईटी घोटाळ्याचे कवित्व

शिक्षण ही कोणत्याही राष्ट्राची सर्वांत मोठी गुंतवणूक मानली जाते. इमारती उभारता येतात, वर्गखोल्या अद्ययावत करता येतात, पुस्तके छापता येतात, अभ्यासक्रम बदलता येतात, तंत्रज्ञान विकत घेता येते; पण उत्तम शिक्षक निर्माण करण्यासाठी कोणताही शॉर्टकट नाही. पैसे देऊन शिक्षकाला नोकरी मिळू शकते, मात्र त्याच्याकडून शिक्षण मिळू शकत नाही. शिक्षक घडावाच लागतो आणि तो तसा आहे काय यासाठी त्याचे मूल्यांकन करावेच लागते. शिक्षक हा समाजाच्या बौद्धिक आणि नैतिक पायाभरणीचा कारागीर असतो. म्हणूनच शिक्षक निवडीची प्रक्रिया जितकी निर्दोष, तितके राष्ट्र अधिक सुरक्षित असते. त्या प्रक्रियेवर संशय निर्माण झाला की त्याचे पडसाद वर्गखोलीच्या चार भिंतींपलीकडे जातात आणि दीर्घकाळ त्याचे परिणाम जाणवत राहतात.

दिवसागणिक नवे-नवे खुलासे ज्यात होत आहेत, अशा महाराष्ट्रातील टीईटी पेपरफुटीच्या घोटाळ्याने हाच प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. प्रश्नपत्रिका फुटणे, गुणांमध्ये फेरफार, बनावट प्रमाणपत्रे, दलालांचे जाळे आणि प्रशासकीय संगनमत हा सारा एका चौकडीचा गेम दिसतो. शिक्षण क्षेत्राला जडलेल्या आजाराची ही लक्षणे आहेत. प्रत्येक वेळी काही आरोपी अटक होतात, चौकशी समित्या नेमल्या जातात आणि काही महिन्यांनी विषय मागे पडतो. पुढच्या भरतीत पुन्हा एखादा नवा घोटाळा समोर येतो. याचा अर्थ व्यक्ती बदलत असतात; पण व्यवस्था बदलत नाही. एका तत्त्वज्ञाचे सुप्रसिद्ध वचन आहे. तो म्हणतो- ''राष्ट्राची शक्ती औपचारिक आणि अनौपचारिक अशा शिक्षणातून विकसित होत असते.'' त्या शिक्षणाची पहिली अट म्हणजे शिक्षकावर असलेला समाजाचा विश्वास. तोच डळमळीत झाला, तर अभ्यासक्रम कितीही आधुनिक असला तरी त्याचा उपयोग शून्य ठरतो. टीईटीची संकल्पना गुणवत्तेच्या संरक्षणासाठी होती. शिक्षक भरतीवर पैसा, शिफारस आणि राजकीय दबाव यांचा प्रभाव कमी व्हावा, हा तिचा हेतू. कारण आधीच आपल्या शिक्षण क्षेत्राला भयंकर कीड लागलेली आहे. गेल्या काही दशकांत खाजगी शाळा-महाविद्यालयांमध्ये भरभक्कम डोनेशन्स घेऊन शिक्षक भरती केली गेली. ज्याला दोन वाक्ये निर्दोष इंग्रजी लिहिता येत नाही, तो इंग्रजीचा मास्तर झाला. ज्याला नकाशा कसा पाहावा हे कळत नाही, तो भूगोलाचा शिक्षक झाला. त्यामुळे किमान दोन पिढ्यांचे नुकसान झाले. त्यातून दिसणारे चित्र असे की, पदव्या भरपूर असतात, पण पाच-सात ओळींचे पत्र नीट लिहिता येत नाही. साधा अर्ज करता येत नाही. स्वतःच्या नावाचेच स्पेलिंग चुकविणारे लोकही याच व्यवस्थेतून निर्माण झाले आहेत. त्यांना साधे-सोपे भाषांतर करता येत नाही. इंग्रजी तर सोडा, मराठीही धड येत नाही. अशा पिढ्यांना रोजगार कसा मिळणार आणि मिळाला तरी तो टिकणार कसा, याचा कुणीही विचार केला नाही. यावर अनेक उपाय झाले. टीईटी हा त्यातलाच एक उपाय. पण, तिचे पेपर फोडण्याचा पराक्रम आपल्या लोकांनी केला. आता त्याची फळे हजारो शिक्षक भोगत आहेत.

नीटच्या पेपरफुटीच्या पाठोपाठ टीईटीचा पेपर फुटला. म्हणजे विद्यार्थ्यांसाठीचेच नव्हे तर मास्तरांसाठी असलेले पेपरही फोडले गेले. त्याचे कारण म्हणजे शॉर्टकट मारण्याची आपल्या समाजाला असलेली वाईट सवय. या सवयीने अनेक पिढ्यांचे नुकसान होतेय, हे कुणाच्याही गावी नाही. परीक्षेचा पेपर फुटतो तेव्हा दोष फक्त एका व्यक्तीपुरता नसतो. पेपर फोडणाऱ्याकडे गिऱ्हाईक असतात म्हणून तो ते करतो. दोघांनाही लोभ असतो. पेपर फोडणाऱ्याला पैशाचा आणि फुटलेला पेपर घेऊन परीक्षेला बसणाऱ्याला शॉर्टकटने आपल्या ध्येयापर्यंत पोहोचण्याचा. ''काम झाले की झाले, बाकी काहीही पाहायचे नसते,'' हा दृष्टिकोन आणि गुणवत्तेपेक्षा भ्रष्ट मार्ग शोधण्याची प्रवृत्ती हे याचे खरे कारण होय. कष्टाला आणि प्रामाणिकपणाला किंमत नाही आणि भ्रष्ट मार्गाने जो यशस्वी झाल्याचे दाखवत असतो, त्याच्या चढत्या कमानीला अंत नाही, अशी आपल्या समाजाची स्थिती. अशात पेपरफुटीसारखी प्रकरणे घडणारच. कोणतीही पेपरफूट ही एका व्यक्तीच्या लोभातून घडत नाही, हेही तेवढेच खरे. प्रश्नपत्रिका तयार करणारा, ती छापणारा, वाहतूक करणारा, सुरक्षित ठेवणारा, परीक्षा घेणारा आणि निकाल प्रक्रिया सांभाळणारा या संपूर्ण साखळीत कुठेतरी जबाबदारीचे सकारण विस्मरण झाले असते. अनेक हातांमधून जाणाऱ्या प्रक्रियेत प्रत्येकाची जबाबदारी थोडीथोडी विरघळते आणि शेवटी दोष कोणाचा, हा प्रश्नच अनुत्तरित राहतो. म्हणून प्रत्येक घोटाळ्यानंतर आरोपी शोधण्याइतकेच महत्त्वाचे काम म्हणजे मूळ प्रक्रिया तपासणे आणि तिच्या प्रत्येक टप्प्यावर तिची वळणे योग्य होती काय, याचा छडा लावणे. तशी चौकशी सुरू झाली आहे, याचे समाधान वाटते. परंतु, अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, याचीही तजवीज सरकारला करावी लागेल.

टीईटी पेपरफुटीच्या दोषींना कठोर शिक्षा देणे आवश्यक आहेच. ती होईलही. पण, प्रश्नपत्रिका व्यवस्थापनासाठी एंड-टू-एंड एन्क्रिप्शन, प्रत्येक टप्प्याचे डिजिटल लॉगिंग, स्वतंत्र तांत्रिक लेखापरीक्षण, परीक्षा संस्थांचे नियमित बाह्य ऑडिट आणि गैरव्यवहार उघड करणाऱ्यांना कायदेशीर संरक्षण हे सारे आता अत्यंत आवश्यक आहे. कारण प्रत्येक पेपरफुटीनंतर चौकशी समिती नेमण्याची परंपरा आहे. पण त्या समित्यांच्या शिफारशींची अंमलबजावणी कोण करतो आणि ती योग्यरीत्या झाली की नाही याचे मूल्यांकन कोण करतो, हा प्रश्न कायम अनुत्तरित राहिलेला आहे. आता तरी तसे घडू नये. शिक्षक भरतीची प्रक्रिया ही पारदर्शकच असली पाहिजे. आणि त्यासाठी टीईटीसारखी परीक्षा ही अत्यंत काटेकोरपणे घेतली गेली पाहिजे.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भरती प्रक्रियेतील विलंब. वर्षानुवर्षे भरती रखडते. लाखो उमेदवार अनिश्चिततेत अडकतात. अशा वातावरणात दलाल, एजंट आणि अवैध व्यवहार करणाऱ्यांचे रान माजते. परीक्षा जितकी कठीण आणि भरती जितकी विलंबित, तितकी भ्रष्टाचाराची कीड वाढत जाते. त्यामुळे नियमित, कालबद्ध भरती हीसुद्धा भ्रष्टाचारविरोधी उपाययोजनाच आहे. शिक्षक मान्यतेसाठी लाखो रुपये शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांना द्यावे लागतात, हे आता उघड गुपित आहे. शिक्षण खाते प्रचंड भ्रष्टाचाराने पोखरलेले आहेच. शालार्थ घोटाळ्यात त्याची अत्यंत कुरूप बाजू उघड झाली. आता टीईटीचा पेपर फुटला आणि त्याची चौकशी सुरू झाली. शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात व्यक्तींपेक्षा संस्थात्मक जबाबदारी जास्त आहे. सरकार ही अनेक संस्था-यंत्रणा संचालित करणारी व्यवस्था आहे. त्यामुळे सरकारची जबाबदारी सर्वांत मोठी. सरकारने ही कारवाई पुढे नेताना हे लक्षात घेतले पाहिजे की, शिक्षण क्षेत्रातील चूक किंवा भ्रष्टाचार इतर क्षेत्रांपेक्षा अधिक गंभीर असतो. निकृष्ट रस्ता काही वर्षांनी पुन्हा बांधता येतो. चुकीचा आर्थिक निर्णय दुरुस्त करता येतो. परंतु अयोग्य शिक्षकामुळे झालेली बौद्धिक हानी अनेक पिढ्यांपर्यंत भरून निघत नाही. शिक्षक भरती ही केवळ रोजगाराची प्रक्रिया म्हणून पाहण्याची चूक आपण वारंवार करतो. प्रत्यक्षात ती राष्ट्राच्या मानवी भांडवलातील सर्वांत महत्त्वाची गुंतवणूक असते. ही गुंतवणूक सार्थकी लावायची असेल तर टीईटीवरील विश्वास पुनर्स्थापित करावा लागेल. त्यासाठी सरकारला दोषींवर कठोर कारवाई करावी लागेल आणि प्रामाणिक व कष्टाळू उमेदवारांना चांगली संधी मिळेल, याची काळजी घ्यावी लागेल. प्रत्येक उमेदवाराला हे निश्चित वाटले पाहिजे की त्याच्या उत्तरपत्रिकेचे मूल्य त्याच्या गुणवत्तेने ठरणार आहे, कोणाच्या संपर्काने किंवा व्यवहारामुळे नाही. टीईटी पेपरफूट घोटाळ्याचे कवित्व हेच सांगते आहे. सरकारच्या म्होरक्यांना त्याचे महत्त्व कळेल तो शिक्षणाच्या दृष्टीने सुदिन. ■

## विशेष

# पुन्हा मोनोरेल...

प्रा. सुखदेव बखळे

मुंबईमध्ये मोनोरेल सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे शहरातील गर्दी कमी करणे आणि पर्यायी सार्वजनिक वाहतूक पर्याय उपलब्ध करून देणे हा होता. पारंपरिक रेल्वेमार्ग आणि रस्त्यांवर वाढत असलेल्या ताणामुळे नवीन वाहतूक व्यवस्थेची गरज निर्माण झाली होती. मोनोरेल ही एका उंच मार्गिकेवर धावणारी आधुनिक रेल्वे प्रणाली आहे. कमी जागेत उभारता येणारी आणि शहरी भागात प्रभावीपणे कार्य करू शकणारी ही व्यवस्था अनेक देशांमध्ये यशस्वी ठरली आहे. मुंबईतही या तंत्रज्ञानाचा वापर करून प्रवाशांना जलद आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आला. मुंबई मोनोरेलचा मार्ग चेंबूर ते संत गाडगे महाराज चौक असा सुमारे २० किलोमीटर लांबीचा आहे. या मार्गामुळे पूर्व उपनगरांपासून दक्षिण-मध्य मुंबईपर्यंतचा प्रवास अधिक सोपा होतो. पहिला टप्पा २०१४ मध्ये सुरू झाला तर दुसरा टप्पा २०१९ मध्ये कार्यान्वित झाला. सुरुवातीच्या काळात या प्रकल्पाबाबत मोठ्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या होत्या; मात्र काही तांत्रिक समस्या, मर्यादित गाड्या आणि देखभालीशी संबंधित अडचणी यामुळे मोनोरेलला अपेक्षित यश मिळू शकले नाही, तरीही या मार्गाचे महत्त्व कायम राहिले. मोनोरेल सुरू करण्यासाठी प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या आहेत. नवीन रोलिंग स्टॉकची जोडणी, सुरक्षा व्यवस्थेतील बदल आणि प्रगत 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीबीटीसी) सिग्नलिंग प्रणालीचा वापर यामुळे संपूर्ण नेटवर्क अधिक विश्वासार्ह बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

आजच्या काळात कोणतीही वाहतूक व्यवस्था स्वतंत्रपणे प्रभावी ठरत नाही. विविध वाहतूक साधनांमध्ये सुलभ बदल करता येणे हेच यशस्वी वाहतूक व्यवस्थेचे मुख्य वैशिष्ट्य असते. चेंबूरमधील ही जोडणी त्याच दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पूर्व उपनगरांमध्ये राहणाऱ्या लाखो नागरिकांना या पुनरारंभाचा थेट फायदा होणार आहे. चेंबूर, कुर्ला, टिळकनगर, वडाळा आणि आसपासच्या परिसरातील लोकांना कमी वेळेत आपल्या गंतव्यस्थानी पोहोचता येईल. रस्त्यांवरील वाहतूक कोंडीमुळे अनेकदा प्रवाशांचा मौल्यवान वेळ वाया जातो. सार्वजनिक वाहतुकीचा प्रभावी पर्याय उपलब्ध झाल्यास हा वेळ मोठ्या प्रमाणात वाचू शकतो.

येत्या काळात कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी मोनोरेल हा नव्याने एक आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा पर्याय ठरू शकतो. याशिवाय मेट्रोशी जोडणी झाल्यामुळे शहरातील इतर भागांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होईल. वाहतूक व्यवस्था आणि आर्थिक विकास यांचा अतिशय जवळचा संबंध असतो. उत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध असणाऱ्या भागांमध्ये गुंतवणूक वाढते, रोजगार निर्मिती होते आणि व्यावसायिक संधी निर्माण होतात. मोनोरेलच्या पुनरारंभामुळे पूर्व उपनगरांमधील अनेक भागांमध्ये व्यावसायिक हालचाली वाढू शकतात. लहान-मोठे उद्योग, दुकाने, सेवा व्यवसाय आणि रिअल इस्टेट क्षेत्रालाही याचा सकारात्मक परिणाम जाणवू शकतो. गाड्यांची नियमित उपलब्धता, वेळेचे पालन, स्वच्छता, सुरक्षा आणि प्रवाशांच्या तक्रारींवर तत्काळ प्रतिसाद या बाबी महत्त्वाच्या ठरणार आहेत. प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी सुलभ तिकीट प्रणाली, एकात्मिक प्रवास कार्ड आणि इतर वाहतूक साधनांशी समन्वयावरही भर देणे आवश्यक आहे. मुंबईमध्ये मेट्रो नेटवर्कचा विस्तार वेगाने सुरू आहे. त्यासोबत मोनोरेलचे प्रभावी पुनरुज्जीवन झाले, तर शहराला बहुआयामी वाहतूक व्यवस्था मिळू शकते. रेल्वे, मेट्रो, मोनोरेल आणि बस सेवा यांचे एकात्मिक जाळे उभे राहिल्यास मुंबईतील वाहतूक व्यवस्थेत मोठे परिवर्तन घडू शकते. भविष्यात अशा प्रकल्पांमुळे नागरिकांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. 'स्मार्ट सिटी'च्या दिशेने वाटचाल करणाऱ्या मुंबईसाठी हे महत्त्वाचे पाऊल मानले जाऊ शकते. मुंबई मोनोरेलचे पुनरागमन ही केवळ एका वाहतूक सेवेची पुनर्सुरुवात नाही, तर शहराच्या वाहतूक व्यवस्थेतील नव्या अध्यायाची सुरुवात आहे. प्रशासनाने सातत्यपूर्ण आणि विश्वासार्ह सेवा दिल्यास मोनोरेल मुंबईच्या वाहतुकीतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनू शकते. त्यामुळे मुंबईकरांच्या अपेक्षा आता या पुनरारंभाकडे लागल्या आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून दररोज लाखो लोक रोजगार, शिक्षण, व्यवसाय आणि विविध कारणांसाठी शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत प्रवास करतात. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि मर्यादित रस्ते यामुळे वाहतूक कोंडी ही मुंबईकरांसमोरील सर्वात मोठ्या समस्यांपैकी एक बनली आहे. या पृष्ठभूमीवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार आणि आधुनिकीकरण अत्यंत महत्त्वाचे ठरते. मुंबई मोनोरेलची संकल्पना २००८ मध्ये पुढे आली. वाढत्या लोकसंख्येमुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करण्यासाठी पर्यायी सार्वजनिक वाहतूक प्रणालीची गरज निर्माण झाली होती. त्यातून मोनोरेल प्रकल्पाचा जन्म झाला. हा प्रकल्प आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असून शहरातील दाट लोकवस्तीच्या भागांमध्ये कमी जागेत प्रभावी वाहतूक व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न होता. या प्रकल्पाचे दोन टप्प्यांमध्ये उद्घाटन करण्यात आले. पहिला टप्पा वडाळा ते चेंबूरदरम्यान ८.८ किलोमीटर लांबीचा असून २ फेब्रुवारी २०१४ रोजी सुरू झाला. दुसरा टप्पा वडाळा ते संत गाडगे महाराज चौक दरम्यान ११.२ किलोमीटर लांबीचा असून ४ मार्च २०१९ रोजी प्रवाशांसाठी खुला करण्यात आला. सुरुवातीला या प्रकल्पाकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले गेले; मात्र विविध तांत्रिक आणि व्यवस्थापकीय अडचणींमुळे मोनोरेलला अपेक्षित प्रतिसाद मिळू शकला नाही. काही काळानंतर सेवा मर्यादित स्वरूपात सुरू राहिली आणि नंतर व्यापक सुधारणा करण्यासाठी ती स्थगित करण्यात आली.

मोनोरेल सेवा बंद करण्यामागे अनेक कारणे होती. प्रवाशांचा विश्वास टिकवून ठेवण्यासाठी सुरक्षित आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था आवश्यक होती. याशिवाय आधुनिक सिग्नलिंग प्रणालीची गरजही जाणवत होती. त्यामुळे प्रगत 'कम्युनिकेशन-बेस्ड ट्रेन कंट्रोल' (सीटीबीसी) तंत्रज्ञानाचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. या तंत्रज्ञानामुळे गाड्यांचे संचालन अधिक सुरक्षित आणि कार्यक्षम होते तसेच नवीन रोलिंग स्टॉक, सुरक्षा यंत्रणांचे आधुनिकीकरण आणि देखभाल व्यवस्थेतील सुधारणा यासाठीही मोठ्या प्रमाणात काम करण्यात आले. या सर्व सुधारणांसाठी काही काळ सेवा स्थगित ठेवणे अपरिहार्य होते. आता ही कामे जवळपास पूर्ण झाली असून मोनोरेल पुन्हा सेवेत येण्यास सज्ज आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# पेरण्या थांबल्या, उत्पादनावर परिणाम

अल निनोच्या प्रभावाने पाऊस लांबेल हा अंदाज गेल्या अनेक दिवसांपासून हवामानावर अभ्यास करणाऱ्या विविध संस्थांनी व्यक्त केला होता. त्यानुसार पाऊस लांबला आहे आणि पेरण्या सुद्धा थांबल्या आहेत. पेरण्या जेवढ्या लांबतील तेवढा शेत पिकाच्या उत्पादनावर परिणाम होईल. राज्यात कोकण, नाशिक, पुणे, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर अशी आठ विभागीय महसुली मंडळे आहेत. खरीप पिकांचा विचार करायचा झाल्यास राज्यात प्रामुख्याने सोयाबीन, तूर, कापूस या प्रमुख पिकांसह मूग, उडीद, मका, ज्वारी, भात, नाचणी, भुईमूग, लाल कांदा ही पिके आहेत. या पिकांच्या पेरणीचे प्रमाण विभागनिहाय कमी-जास्त आहे. राज्यात १ ते २९ जून दरम्यान सरासरी २००.७ मिमी. पाऊस अपेक्षित होता. मात्र, प्रत्यक्षात तो १११.१ मिमी. झाला आहे. मागच्या वर्षी तो १९९ मिमी. झाला होता. सध्या जवळपास ५० टक्के पाऊस कमी झाला असल्याने शेतकऱ्यांची तयारी जरी पूर्ण असली तरी त्यांना पेरणी करणे शक्य झालेले नाही. शासनाने सुद्धा पेरणीची घाई न करण्याच्या सूचना दिल्या आहेत. ज्यांच्याकडे सिंचनाची व्यवस्था आहे, त्यांनी धाडस दाखवून पेरणी केली आहे. पण, ते प्रमाण खूपच कमी आहे. पावसाअभावी पेरण्या उलटण्याची शक्यता जास्त असल्याने कोणी हिंमत केलेली नाही. जून अखेरपर्यंत राज्यातील ३५५ तालुक्यांपैकी ४८ तालुक्यांमध्ये अपेक्षित सरासरीच्या ० ते २५ टक्के, ८४ तालुक्यांमध्ये २५ ते ५० टक्के, ११२ तालुक्यांमध्ये ५० ते ७५ टक्के, ६९ तालुक्यांमध्ये ७५ ते १०० टक्के आणि ४२ तालुक्यांमध्ये अपेक्षित सरासरीच्या १०० टक्के पाऊस झाला आहे. याचाच अर्थ नियमानुसार १११ तालुक्यांमध्ये सध्या पेरणीयोग्य स्थिती आहे. राज्यात खरपी पिकाचे सरासरी एकूण क्षेत्र १४४.३६ लाख हेक्टर आहे. २९ जूनपर्यंत फक्त १०.९५ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. त्यात कपाशी ७.२७, सोयाबीन १.१९, तूर ०.८३, मका ०.८७ लाख हेक्टरवर असून उर्वरित क्षेत्रात अन्य पिके पेरण्यात आली आहे. त्याची एकूण टक्केवारी ८ आहे. मागील वर्षी याच कालावधीत ७६.३१ लाख हेक्टरवर पेरणी झाली होती. सरासरी त्याची टक्केवारी ५३ होती. यावरून यंदाच्या परिस्थितीचा अंदाज येतो. विभागनिहाय आकडेवारी पाहिली तर राज्यात सर्वांत कमी कोकण विभागात खरिपाचे ३.९२ लाख हेक्टर क्षेत्र असून तेथे फक्त १ टक्का, नाशिक विभागात खरिपाचे क्षेत्र २०.३३ लाख हेक्टर आहे. येथे १३ टक्के, पुणे विभागात खरिपाचे लागवड क्षेत्र १२.५६ लाख हेक्टर असून आतापर्यंत फक्त ३ टक्के, कोल्हापूर विभागात खरिपाचे ७.२५ लाख हेक्टर क्षेत्र असून आतापर्यंत फक्त १० टक्के पेरणी झाली आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात २१.४२ लाख हेक्टर क्षेत्र खरिपाचे आहे. तेथे आजपर्यंत ८ टक्के पेरणी आटोपली. लातूर विभागात खरिपाचे क्षेत्र २८.३१ लाख हेक्टर असून मंगळवार ३० जूनपर्यंत येथे फक्त ३ टक्के तर नागपूर विभागात १८.९६ लाख हेक्टर क्षेत्र खरिपाचे असून आतापर्यंत ८ टक्के पेरणी झाली आहे. राज्यात सर्वाधिक खरिपाचे क्षेत्र अमरावती विभागात ३१.६१ लाख हेक्टर आहे. येथे आजच्या तारखेत ३.२४ लाख हेक्टर क्षेत्रावर म्हणजेच फक्त १० टक्के पेरणी झाली आहे.

खरिपाचे क्षेत्र व आजपर्यंत झालेल्या पेरणीची आकडेवारी धक्कादायक आहे. त्यावरून यंदाच्या खरीप हंगामाची दिशा आणि दशेचे आकलन होते. चालू आठवड्यात पाऊस सामान्यच राहण्याची शक्यता असल्याने पेरण्यांना किती वेग येईल ही शंकाच आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात अपेक्षित पावसाच्या सरासरी ७५ टक्के पाऊस झाला तरच शेतकऱ्यांकडून पेरणीची घाई होऊ शकते. राज्यातल्या १११ तालुक्यांमध्ये सरासरीच्या तुलनेत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस झाला आहे. जी काही १० टक्के पेरणी झाली आहे, ती याच तालुक्यांमध्ये आहे. सोयाबीनची पेरणी फारफार तर १५ जुलैपर्यंत करता येते. त्यानंतर केली तर उत्पादनात मोठी घट येते. याचप्रमाणे खरिपातल्या प्रत्येक पिकाचे आयुष्यमान ठरले आहे. त्याचा पेरणी, मशागतीचा व काढणीचा कालावधी कमी-अधिक प्रमाणात निश्चत आहे. सुरुवातीलाच हे चक्र काही कारणाने खंडित झाले किंवा लांबले तर त्याचा थेट परिणाम उत्पादनावरच होतो. स्वाभाविकपणे शेतकऱ्यांचे उत्पन्न देखील कमी होते. त्याचा प्रभाव अर्थव्यवस्थेवर पडतो. राज्यातल्या प्रत्येक विभागाची सध्या जी स्थिती आहे, त्यानुसार खरीप हंगामावर अडचणीचे ढग घोंगावत आहे. यातून बळीराजाची सुटका होऊन सर्वांना दिलासा मिळावा हीच अपेक्षा वरुणराजाकडून आहे. ■

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

# नवविधा भक्ती : उद्धाराचा मार्गसोपान !

प्रा. दिलीप जोशी

आजपर्यंत आपण सातसमुद्र, पर्वत, ऋषी अशी सप्त बाबींची माहिती पाहिली. आता नवरस, नवग्रह, नवरात्र, नवद्वार अशी नऊची मालिका पाहूया. नवविधा भक्ती आपल्या संस्कृतीचे संरक्षक कवच आहे. विविध मार्गाने त्या जगन्नाथाला 'कर्ता करविता तूच' असल्याचे सांगून आर्त हाक मारणे याला भक्तिमार्ग म्हणतात. या ब्रह्मांडाचे जाते चालविणारा तो पांडुरंग परमात्मा त्याला आळविण्याचे नऊ प्रकार म्हणजे नवविधा भक्ती. भक्तिशास्त्रात प्रामुख्याने दोन प्रकारच्या नवविधा भक्ती सांगण्यात येतात.

१) श्रीमद्‌भागवत महापुराणात भक्त प्रल्हादाने आपले पिता म्हणजे हिरण्यकश्यपूला भक्तीचे महत्त्व सांगताना नऊ भक्ती सांगितल्या. त्याचा अत्यंत प्रसिद्ध श्लोक आहे-

**'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।**
**अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥'**

२) नवविधा भक्तीचा दुसरा प्रकार भगवान श्रीरामचंद्र आणि शबरी यांच्यातील संवादात श्रीरामचरितमानसात दिला आहे. त्याची चौपाई अशी-

'प्रथम भगति संतन्ह कर संगा। दूसरि रति मम कथा प्रसंगा।।
गुर पद पकंज सेवा तीसरि भगति अमान।
चौथि भगति मम गुन गन करइ कपट तजि गान।
मन्त्र जाप मम दृढ़ बिस्वासा। पंचम भजन सो बेद प्रकासा।।
छठ दम सील बिरति बहु करमा। निरत निरंतर सज्जन धरमा।।
सातवँ सम मोहि मय जग देखा। मोतें संत अधिक करि लेखा।।
आठवँ जथालाभ संतोषा। सपनेहुँ नहिं देखइ परदोषा।।
नवम सरल सब सन छलहीना। मम भरोस हियँ हरष न दीना।।'

आज आपण श्रीमद्‌भागवत महापुराणातील नवविधा भक्तीचा विचार करू. यामध्ये नऊ प्रकारच्या भक्ती सांगितल्या आहेत-

**१) श्रवण भक्ती** – श्रीमद्‌भागवत पुराणात विदित या भक्ती प्रकारात श्रवण म्हणजे ऐकणे अर्थात भगवंताचे गुणगान, चरित्र, लीला, स्वरूप याबद्दल निरंतर ऐकत राहणे होय. सतत भगवंताबद्दल श्रवण केल्याने भगवंताचा संपूर्ण परिचय होऊन देवाविषयी प्रेम, जिव्हाळा आणि आपुलकी वाढीस लागते.

**२) कीर्तन भक्ती** – कीर्तनभक्तीत माणूस प्रथम श्रवण करतो, त्यानंतर तो बोलतो. कीर्त म्हणजे लयबद्ध स्तुती, गौरव, गुणगान करणे. गायन करून भक्तिरसात तल्लीन होण्याचे साधन म्हणजे कीर्तन. टाळ, मृदंग, संगीताच्या साथीने देहभान विसरून भगवंताप्रति तन्मय होणे म्हणजे कीर्तन. वीणा आणि चिपळ्या घेऊन देवर्षी नारद 'नारायण नारायण' ही लयबद्ध आर्त हाक भगवंताला देतात. स्वतः भगवंत नारदांना सांगतात की,

**'नाहं वसामि वैकुण्ठे योगिनां हृदये न च।**
**मद्‌भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद।**

**३) स्मरण भक्ती** – या भक्तीत मानव करीत असलेल्या प्रत्येक कृतीत भगवंताचीच आठवण ठेवणे. 'दलिताकांडीता तुज गाईन अनंता' हीच भावना या भक्तीत असते. त्यासाठी भक्त प्रल्हादाप्रमाणे सतत जप, मंत्र, नामस्मरण किंवा भरताप्रमाणे प्रत्येक कृती म्हणजे रामकार्य. .

**४) पादसेवन भक्ती** – या प्रकारात भगवंताच्या किंवा सद्‌गुरूंच्या चरणांची सेवा म्हणजे पादसेवन भक्ती होय.

**'पादसेवन तेचि जाणावे, काया वाचा मनोभावे ।**
**सद्‌गुरूचे पाय सेवावे,सद्‌गति कारणे ।।'**

यामध्ये १) प्रत्यक्षात सद्‌गुरूंचे पाद्यपूजन, त्यांच्या सहवासात राहून त्यांची मनोभावे, समर्पित अंतःकरणाने सेवा करणे. २) जेथे संतांचे पाय लागले अशा तीर्थस्थानी जाऊन तेथे पादुका पूजन. ३) दीनदलितांची सेवा. या तीन प्रकारात पादसेवन भक्ती करता येईल.

**५) अर्चन भक्ती** – श्रद्धायुक्त अंतःकरणाने सगुण साकार परमेश्वराची विधिवत पूजा म्हणजे अर्चनभक्ती. सोप्या भाषेत सांगू... पूजेचे ताट तयार करून मूर्तीची पूजा म्हणजे अर्चन भक्ती. षोडशोपचारे, पंचोपचारे विधिवत शास्त्रोक्त पूजा म्हणजे अर्चन भक्ती. अशी पूजा विधिवत किंवा मानस पूजा असू शकते. पूजा हा शब्द पूजपासून तयार होतो. पूजचा एक अर्थ पुष्पांनी पूजा होते. फुले वाहण्यासाठी मूर्ती पाहिजे. त्यासाठी निर्गुण निराकार अमूर्त परमेश्वराला सगुण साकार मूर्त स्वरूपात पाहणे जरूरीचे.

**६) वंदन भक्ती** – शरणागत होऊन भगवंताला, सद्‌गुरूला नमस्कार करणे याला वंदन भक्ती म्हणतात. विनम्रभावाने, लीन होऊन दंडवत प्रणाम म्हणजे वंदन भक्ती. आपण जेव्हा एकमेकांना भेटतो तेव्हा हात जोडून नमस्कार म्हणतो. ही वंदन भक्तीची प्राथमिक अवस्था आहे.

**'पंढरीच्या लोका नाही अभिमान, पाया पडे जन एकमेका !'**

एकमेकांना पांडुरंग समजून, माउली, संत समजून वारकरी मंडळी एकमेकांच्या पाया पडतात. हीच वंदनभक्ती आहे. भगवंताच्या चरणांवर दंडवत करणे नामे वंदनभक्ती. या भक्तीसाठी स्वतःला न्यून समजावे लागते. स्वभावात विनम्रता जाणीवपूर्वक धारण करावी लागते.

'सहावी भक्ती ते वंदन, करावे देवाशी नमन ।
संत साधू आणि सज्जन, नमस्कारित जावे ।।'

देवाला, सूर्याला, सद्‌गुरूला, भक्ताला, ज्ञानी, तापसी आणि योग्यांना, वडीलधाऱ्यांना नमस्कार म्हणजे वंदन भक्ती होय.

**७) दास्य भक्ती** – भक्तिशास्त्रातील सर्वात गोड भक्ती प्रकार म्हणजे दास्य भक्ती होय. भक्ताने देवाचा, सद्‌गुरूचा दास बनून राहणे. सेवक बनून निरपेक्ष, विनम्र भावाने आज्ञाधारक बनून सेवा करणे म्हणजे दास्यभक्ती.

**८) सख्य भक्ती** – भक्तीचा हा आठवा प्रकार म्हणजे देवाप्रती मैत्री भाव ठेवून त्याची भक्ती करणे. तो आपला सखा आहे हे मानले तर देव आणि भक्त यांच्यात द्वैत किंवा दुरावा राहण्याची शक्यता कमी. एकदा मैत्रीचा भाव आला तर तिथे दबाव, जोरजबरी राहत नाही तर हार्दिक नाते देव आणि भक्तात निर्माण होते.

**९) आत्मनिवेदन भक्ती** – नवविधा भक्तीतील सर्वात अंतिम प्रकार म्हणजे आत्मनिवेदन भक्ती आहे. आत्मनिवेदन म्हणजे आपल्या मनातील सर्व देवाला सांगणे. निवेदन शब्दात नि वद म्हणजे आपल्याला जे पाहिजे ते आपल्याहून सामर्थ्यवंतासमोर कृतज्ञतापूर्वक आणि विश्वासाने सांगणे. आत्मनिवेदन भक्तीत भक्त आपल्या मनातील सर्व निःसंकोचपणे शरणभावे देवाला सांगतो. देव भक्ताला प्रतिसाद देतो. आत्मनिवेदन जीवीच्या जिवलगाशीच होऊ शकते. तो फक्त देव असतो. अनन्यभाव ठेवून ईश्वराला सांगायचे असेल तर पराकोटीची श्रद्धा कमवावी लागते. संत नामदेव महाराजांनी निवेदन केले आणि भगवंतांनी निवद म्हणजे नैवेद्य ग्रहण केला. त्यासाठी निरातिशय आर्त हवे. आपण दररोज झोपण्यापूर्वी देवाजवळ सर्व सांगा. हीच आत्मनिवेदन भक्ती होईल. नवविधा भक्तीतील एका जरी भक्तीसाठी अचूक प्रयत्न केला तर ऐहिक आणि पारलौकिक सुखाची प्राप्ती होतेच. ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### निसर्गाशी स्पर्धा नव्हे, सहजीवनाची गरज

आज जगभर हवामानातील बदल ही केवळ वैज्ञानिक चर्चा राहिलेली नाही, तर ती प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील कठोर वास्तव बनली आहे. कुठे मुसळधार पावसामुळे पूर, तर कुठे दीर्घकाळ दुष्काळ, कुठे असह्य उष्णतेच्या लाटा, तर कुठे अवकाळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान. या सर्व घटनांमधून एकच संदेश स्पष्ट होतो निसर्ग बदलाचे परिणाम शेवटी सर्वांनाच भोगावे लागतात. माणसाने विज्ञान, तंत्रज्ञान आणि विकासाच्या नावाखाली निसर्गावर विजय मिळवण्याचा प्रयत्न केला. जंगलतोड, डोंगरांची तोडफोड, नद्यांचे अतिक्रमण, भूजलाचा अमर्याद उपसा, प्रदूषण आणि अनियंत्रित शहरीकरण यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. काही काळासाठी हा विकास लाभदायक वाटला, परंतु आता त्याची किंमत संपूर्ण मानवजातीला चुकवावी लागत आहे. निसर्गाशी स्पर्धा करण्याची मानवी वृत्ती आज संकटाचे मूळ ठरत आहे. निसर्गावर माणसाचे वर्चस्व कधीच टिकू शकत नाही. निसर्ग शांत असतो, पण त्याचा समतोल बिघडला की त्याचे परिणाम अत्यंत भीषण स्वरूपात समोर येतात. विजांचा वाढता प्रकोप, उष्णतेच्या लाटा, भूस्खलन, वणवे आणि पाणीटंचाई ही त्याचीच उदाहरणे आहेत. या संकटाचा सर्वाधिक फटका शेतकरी, मजूर आणि सामान्य नागरिकांना बसतो. पिकांचे नुकसान, पाण्याची कमतरता, आरोग्याच्या समस्या आणि आर्थिक अस्थिरता यामुळे ग्रामीण तसेच शहरी जीवन विस्कळीत होत आहे. हवामान बदल हा आता भविष्यातील नव्हे, तर वर्तमानातील गंभीर प्रश्न आहे.

आज गरज निसर्गाशी संघर्ष करण्याची नाही, तर त्याच्याशी समतोल सुसंवाद साधण्याची आहे. वृक्षलागवड, जलसंधारण, पर्यावरणपूरक विकास, प्रदूषण नियंत्रण आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा संयमी वापर ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. शासनाने कठोर पर्यावरणीय धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करणे जितके आवश्यक आहे, तितकेच नागरिकांनीही आपल्या जीवनशैलीत बदल करणे महत्त्वाचे आहे. निसर्ग कोणाचाही शत्रू नाही; परंतु त्याच्या नियमांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना तो कठोर इशारा देतो. विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. कारण निसर्गाचे संरक्षण म्हणजेच मानवजातीचे भविष्य सुरक्षित करणे होय. निसर्गाशी स्पर्धा करून नव्हे, तर त्याच्यासोबत सहजीवन स्वीकारूनच पुढील पिढ्यांना सुरक्षित, समृद्ध आणि संतुलित पर्यावरण देणे शक्य होईल.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

■■■

### ईव्ही कारसाठी १०० टक्के सवलतीचे नवे धोरण

दिल्ली सरकारने ईव्ही कारसाठी अनेक सवलती १ जुलैपासून जाहीर केल्या आहेत. तीस लाख रुपयांपर्यंत इलेक्ट्रिक कारला कर व नोंदणी शुल्कात शंभर टक्के सवलत देण्यात येणार आहे. इलेक्ट्रिक दुचाकी खरेदी केल्यास पहिल्या वर्षी तीस हजार, दुसऱ्या वर्षी वीस हजार तर तिसऱ्या वर्षी दहा हजार रुपये अनुदान मिळणार आहे. तीन चाकी



इलेक्ट्रिक वाहन खरेदी केल्यास पहिल्या वर्षी पन्नास हजार, तर एन-१ या श्रेणीतील वाहनावर खरेदीत तब्बल एक लाखापर्यंत प्रोत्साहन दिले जाणार आहे. जुने चारचाकी वाहन स्क्रॅप केल्यास व इलेक्ट्रिक वाहन घेतल्यास वाहनमालकांना एक लाख रुपयांचे अनुदान मिळणार आहे. १ जानेवारी २०२७ पासून केवळ इलेक्ट्रिक वाहनांचीच नोंद होईल, तर १ जुलै २०२८ पासून नवीन पेट्रोल व डिझेलवरील वाहने यांना परवानगी दिली जाणार नाही. दिल्ली सरकार यासाठी येत्या चार वर्षात १५००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. राजधानी प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. दिल्ली शहरात प्रदूषण भयंकर असल्याने ही सवलत जाहीर करणे आवश्यक होते. आता दिल्लीत नजीकच्या काळात ईव्ही कार मोठ्या प्रमाणात खरेदी केल्या जातील व त्याचा फायदा पर्यावरणाला होईल. आज पुणे, मुंबई शहरात सुद्धा पेट्रोल व डिझेलची वाहने प्रचंड आहेत व त्यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात होत आहे. अशा काही सवलती दिल्यास येथेही त्याचा चांगला परिणाम होईल. आज प्रदूषण कमी करणे ही काळाची गरज आहे.

**शांताराम वाघ**/पुणे

■■■

### तळमळीने मांडलेले विचार

'नसरापूरचा निकाल अपवाद नव्हे, नियम व्हावा' तरुण भारतमधील मंगळवार, ३० जूनचा अग्रलेख वाचला. अग्रलेखातून खरोखरंच तळमळीने मांडलेले अभ्यासपूर्ण मौलिक विचार मनाला भावले. तसे पाहता गुन्हा घडल्यापासून अवघ्या पंधरा दिवसांत पोलिस यंत्रणा आणि न्यायालयाकडून सर्व मुद्यांचा कसोशीने अभ्यास करून उचित निर्णय दिला. कौतुक करावे थोडेच. या अनुषंगाने चिमुरडीला न्याय मिळाला. माझ्या मते, या निकालामुळे भविष्यात घडणाऱ्या अशा प्रकरणांना चाप बसण्यास मदत होईल. ■

**डॉ. राहुल भोसले**/९८९०४६१८८६

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# ग्लोबल विकास ट्रस्ट, वृक्ष संवर्धन चळवळ आणि परळी नगरपालिकेचा स्तुत्य उपक्रम पथनाट्यातून दिला वृक्षसंगोपनाचा संदेश



**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :** पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंगोपनाचा प्रभावी संदेश देण्यासाठी परळी शहरात वटपौर्णिमेच्या औचित्यावर विशेष जनजागृतीपर पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्लोबल विकासच ट्रस्ट, वृक्षसंवर्धन चळवळ व नगरपालिका प्रशासन आणि यांच्या संयुक्त विद्यमाने हा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

आज, सोमवार २९ जून रोजी शहरातील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालय, मिलिंद महाविद्यालय, विद्यार्थिनी विद्यालय व भेल स्कूलमध्ये पथनाट्याला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नाट्यातून दिला 'झाडे लावा, झाडे जगवा'चा संदेश

वाढते प्रदूषण आणि निसर्गाचा बिघडत चाललेला समतोल या पार्श्वभूमीवर मानवी जीवनात वृक्षांचे काय महत्त्व आहे, हे कलाकारांनी आपल्या प्रभावी अभिनयातून मांडले. केवळ झाडे लावणे पुरेसे नसून त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज कशी बनली आहे, यावर पथनाट्यातून प्रकाश टाकण्यात आला. पाणीटंचाई, ग्लोबल वॉर्मिंग आणि वृक्षतोडीचे दुष्परिणाम अत्यंत सोप्या आणि अंगावर शहारे आणणाऱ्या प्रसंगांतून लोकांसमोर मांडण्यात आले.

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि प्रशासनाचा स्तुत्य पुढाकार

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि स्थानिक वृक्षसंवर्धन चळवळीचे कार्यकर्ते गेल्या अनेक दिवसांपासून शहरात पर्यावरणपूरक कामांमध्ये सक्रिय आहेत. या मोहिमेला नगरपालिका प्रशासनाची मोलाची साथ लाभली आहे. प्रशासकीय अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या वाढदिवसाला किंवा महत्त्वाच्या प्रसंगी किमान एक तरी झाड लावून ते जगवण्याचे आवाहन केले.

## कोद्री शिवारात हिंस्त्र पशुचा वावर शेतकऱ्यात भीतीचे वातावरण

# एका रात्रीत शेडमध्ये घुसून 14 शेळ्या केल्या ठार

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील कोद्री गावात आबासाहेब पोटभरे यांच्या शेतातील शेडमध्ये एका अज्ञात हिंस्त्र प्राण्याने धुमाकूळ घालत तब्बल १४ शेळ्यांचा फडशा पाडला आहे. कोद्री परिसरामध्ये घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आणि पशुपालकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे.

कोद्री शिवारातील आबासाहेब पोटभरे यांची शेती. एकाच रात्रीत झालेल्या हिंस्त्र प्राण्याच्या हल्ल्यात १४ शेळ्यांचा मृत्यू झाला.अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे शेतकरी आबासाहेब पोटभरे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे,



तर परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

घटनेनंतर संबंधित विभागाचे अधिकारी व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत शवविच्छेदन अहवाल आणि पोलिसांकडून पंचनामा पूर्ण करण्यात आला आहे.

या हल्ल्यामागे नेमका कोणता हिंस्त्र प्राणी (उदा. बिबट्या, लांडगा किंवा इतर) आहे, हे स्पष्ट करण्यासाठी वनविभागाकडून कसून तपास सुरू असून कोद्री शिवारात या प्राण्याचा वावर असल्याचे अधिकृत पुरावे गोळा केले जात आहेत. स्थानिक शेतकऱ्याची या हल्ल्यामुळे उदरनिर्वाहाचे साधन हिरावल्या गेलेल्या आबासाहेब पोटभरे यांना शासनाकडून त्वरित आणि पूर्ण आर्थिक मदत मिळावी, तसेच परिसरातील हिंस्त्र प्राण्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी आता स्थानिकांकडून जोर धरत आहे.

या घटनेच्या अधिकृत नोंदी आणि नुकसान भरपाईच्या प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी तुम्ही बीड जिल्हा प्रशासनाचे अधिकृत संकेतस्थळ पाहू शकता. वनविभागाकडून या हिंस्त्र प्राण्याचा शोध सुरू असून शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी शेतात जाताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दिंडीत येणाऱ्या वारकऱ्याची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी : जिल्हाधिकारी

**बीड, दि.30 (जिमाका) :-** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातून जाणाऱ्या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक असून पालखी मार्गावरील समन्वयासाठी जिल्ह्यात एका नोडल ऑफिसरची नियुक्ती करण्यात आली आहे. पालखी, दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः भेट देऊन पाहणी करावी आणि तेथील स्थानिक अडचणी तातडीने दूर कराव्यात. सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी वारकऱ्यांच्या सुविधेसाठी तत्पर रहावे. तरी पालखी सोबत दिंडीत येणाऱ्या एकाही वारकऱ्याची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातून जाणाऱ्या पालखी आणि दिंडी मार्गावरील सोयी-सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, महावितरणचे अधिक्षक अभियंता प्रेमसिंग राजपुत यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांची यावेळी प्रत्यक्ष उपस्थिती होती तर व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी आदि उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, जिल्ह्यात बीड जिल्ह्यामधून आषाढी एकादशीनिमित्त शांतीब्रम्ह श्री. संत एकनाथ महाराज पालखी श्रीक्षेत्र पैठण, श्री. विठ्ठल रुक्मीणी संस्थान श्री.तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर, श्री. संत गजानन महाराज संस्थान शेगाव आणि श्री. संत मुक्ताबाई संस्थान मुक्ताईनगर तापितीर या दिंडी,

# संस्था, जनता आणि प्रशासन यांच्या समन्वयातून "ग्लोबल गाव" घडेल - जलनायक मयंक गांधी

**परळी वैजनाथ :** कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्र, सिरसाळा येथे शुक्रवार (ता.26) रोजी आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत तालुक्यातील सर्व गावांचे पोलिस पाटील, महसूल विभागाचे तलाठी, मंडळ अधिकारी तसेच विविध विभागांतील मान्यवर अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी "25 लक्ष वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियान" तसेच "ग्लोबल गाव" स्पर्धेची सविस्तर माहिती देण्यात आली. बैठकीत वृक्ष लागवड ही केवळ एकदिवसीय मोहीम नसून लावलेल्या प्रत्येक रोपाचे संवर्धन, संरक्षण आणि जगविणे हीच अभियानाची खरी यशस्विता आहे, यावर विशेष भर देण्यात आला. प्रत्येक गावाने लोकसहभागातून वृक्षसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारून पर्यावरण संवर्धनाबरोबरच जलसंधारण, जैवविविधता आणि शाश्वत ग्रामीण विकासासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी जलनायक मयंक गांधी यांनी ग्लोबल विकास ट्रस्टच्या विविध लोकाभिमुख उपक्रमांची माहिती देत, शेती, पाणी, पर्यावरण आणि ग्रामविकासाच्या क्षेत्रात सुरू असलेल्या कामांचा अधिकाधिक शेतकरी बांधवांना लाभ मिळावा, यासाठी प्रशासन आणि ग्रामस्तरावरील सर्व घटकांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. मयंक गांधी म्हणाले, "वृक्ष लावणे ही सुरुवात आहे; पण त्या प्रत्येक वृक्षाला जगविणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. 25 लाख वृक्ष लागवड आणि संवर्धन अभियानातून प्रत्येक गावाने हरित विकासाचा संकल्प करावा. लोकसहभाग, प्रशासनाचे सहकार्य आणि ग्रामस्थांची जबाबदारी या त्रिसूत्रीच्या बळावर आपण पर्यावरण समृद्ध करण्यासोबतच भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित, समृद्ध आणि स्वावलंबी गावे घडवू शकतो."

शुक्रवारी कृषीकुल येथे झालेल्या व्यापक बैठकीस डॉ.हरिश्चंद्र वंगे, माजी नायब तहसीलदार बाबुराव रूपनर, नायब तहसीलदार पंडित सुरवसे, तालुका कृषी अधिकारी अर्चना नागरगोजे, परळी ग्रामीण पोलीस निरीक्षक सय्यद मजहर आली, सिरसाळा पोलिस उप निरीक्षक राठोड बाबा भिलू यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. उपस्थितांनीही वृक्षसंवर्धन, ग्रामविकास आणि शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

# शंकर देशमुख यांनी घेतला प्रधानमंत्री जीवन ज्योती व सुरक्षा विमा योजनांचा लाभ, नागरिकांना केले सहभागी होण्याचे आवाहन

**बीड, दि. _ :** पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' कार्यक्रमातून केंद्र सरकारच्या सामाजिक सुरक्षा योजनांचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे केलेले आवाहन प्रत्यक्ष कृतीत उतरवत भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी स्वतः तसेच त्यांचे वाहन चालक श्री. अशोक नन्नवरे यांच्यासह स्टेट बँक ऑफ इंडिया, कडा शाखा येथे प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY) या दोन्ही योजनांचा लाभ घेतला. यावेळी शाखा व्यवस्थापक श्री. प्रशांत झाडे यांनी योजनांची सविस्तर माहिती देत प्रत्येक पात्र नागरिकाने या योजनांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

शंकर देशमुख म्हणाले की, केंद्र सरकारने सर्वसामान्य नागरिकांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षिततेसाठी सुरू केलेल्या या दोन्ही योजना अत्यंत लोकहितकारी आहेत.



प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत केवळ ₹४३६ (काही बँकांमध्ये लागू शुल्कामुळे सुमारे ₹४४०) वार्षिक प्रीमियममध्ये ₹२ लाखांचे जीवन विमा संरक्षण मिळते. १८ ते ५० वर्षे वयोगटातील नागरिक या योजनेत सहभागी होऊ शकतात. विमाधारकाचा कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास नामनिर्देशित व्यक्तीस ₹२ लाखांची आर्थिक मदत दिली जाते.

# सततच्या जाच असह्य झालेल्या पत्नीने केला दारुड्या पतीचा खून

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई तालुक्यातील घटना; मुलाच्या फिर्यादीवरून आई विरुद्ध गुन्हा दाखल. अंबाजोगाई तालुक्यातील पाटोदा येथे कौटुंबिक वादातून पत्नीनेच पतीचा वायरने गळा आवळून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दारुड्या पतीच्या सततच्या त्रासाला कंटाळून असहाय्य झालेल्या पत्नीने सुरुवातीला पतीला हृदयविकाराचा झटका आल्याचा बनाव रचला होता, मात्र अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांच्या सतर्कतेमुळे हा खोटा बनाव उधळला गेला असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पाटोदा येथील रहिवासी शरीफ पठाण हे नेहमी दारू पिऊन घरी येऊन पत्नी नसरीन पठाण यांच्याशी वाद घालत असत. घटनेच्या रात्री देखील पती दारूच्या नशेत सतत त्रास देत असल्याने आणि घरात वाद विकोपाला गेल्याने, अत्यंत असहाय्य झालेल्या नसरीन यांनी रागाच्या भरात घरातील काळ्या वायरने शरीफ यांचा गळा आवळून त्यांना जीवे ठार मारले. या कृत्यानंतर त्यांनी घाबरून पतीला 'हार्ट अटॅक' आल्याचा आणि ते हालचाल करत नसल्याचा बनाव रचत नातेवाईकांच्या मदतीने त्यांना रात्रीच शासकीय रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी शरीफ यांना घोषित केल्यानंतर हा नैसर्गिक मृत्यू भासवण्याचा नसरीन यांचा प्रयत्न होता.

मात्र, अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुरलीधर खोकले यांनी मृतदेह पाहताच त्यांच्या तीक्ष्ण नजरेतून मृतदेहाच्या गळ्याभोवती असलेले काळसर व्रण आणि अंगावरील ओरखडे सुटले नाहीत. संशय आल्याने त्यांनी नसरीन यांची कसून चौकशी केली असता, तिने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर शवविच्छेदन अहवालातही गळा आवळल्यानेच मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले.

याप्रकरणी मृत शरीफ यांचा २४ वर्षीय मुलगा साहील शरीफ पठाण याने दिलेल्या फिर्यादीवरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी आई नसरीन शरीफ पठाण हिच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ च्या कलम १०३ आणि ११५(२) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या खळबळजनक प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संतोष जाधवर हे करत आहेत.

# महाराष्ट्र राज्य एस.टी. निवृत्त कर्मचारी संघटनेच्या मराठवाडा प्रादेशिक सचिवपदी हेमंत कुलकर्णी यांची फेरनिवड



**परळी वैजनाथ | प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य निवृत्त परिवहन कर्मचारी संघटनेच्या नुकत्याच संपन्न झालेल्या केंद्रीय कार्यकारिणी बैठक व वार्षिक अधिवेशनात मराठवाडा प्रादेशिक सचिवपदी परळी वैजनाथ येथील श्री. हेमंत कुलकर्णी यांची सर्वानुमते फेरनिवड करण्यात आली. संघटनेच्या वतीने त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर पुन्हा एकदा प्रादेशिक सचिव पदाची जबाबदारी सोपविली असून या निवडीबद्दल श्री. कुलकर्णी यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

याच बैठकीत महाराष्ट्र राज्य निवृत्त परिवहन संघटनेच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी कमलाकर रोटे (कोल्हापूर), महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्षपदी महादेव कुलकर्णी (सांगली), सरचिटणीसपदी सदानंद विचारे (ठाणे), संघटक सचिवपदी प्रभाकर आंबेकर (बीड) तसेच कोषाध्यक्षपदी गणेश वायफळकर (मुंबई) तर छत्रपती संभाजी नगरचे सय्यद हमीद यांची महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. याशिवाय इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली.

मराठवाडा प्रादेशिक सचिवपदी फेरनिवड झाल्यानंतर हेमंत कुलकर्णी यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सरचिटणीस सदानंद विचारे यांचा देखील त्यांच्या गत वर्षातील उल्लेखनीय कार्याबद्दल सत्कार करण्यात आला. बैठकीत नव्याने सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः ईपीएफ-९५ अंतर्गत पेन्शन वाढीसाठी संघटनेच्या वतीने विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच राज्यभर पदाधिकाऱ्यांचे दौरे आयोजित करून मेळावे घेण्यात येणार असून, पेन्शन वाढीसाठीच्या आंदोलनाची दिशा निश्चित करण्याचे सांगण्यात आले.

# अंबाजोगाई पोलिसांची मोठी कारवाई; कत्तलीसाठी नेली जाणारी 7 गोवंशीय जनावरे जप्त दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

## नाकाबंदीत पोलिसांना मोठे यश; 8.60 लाखांचा मुद्देमाल जप्त

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई शहर पोलिसांची मोठी कार्यवाही अंबाजोगाई शहर पोलिसांनी पहाटेच्या सुमारास केलेल्या नाकाबंदी दरम्यान कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असलेली ७ गोवंशीय जनावरे आणि एक बोलेरो पिकअप असा एकूण १८.६० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी दोन आरोपीविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २९ जून २०२६ रोजी पहाटे सुमारे ४.०० वाजता गुप्त माहितीच्या आधारे छत्रपती संभाजी महाराज चौक, लातूर टी- पॉइंट, अंबाजोगाई येथे नाकाबंदी करण्यात आली. सुमारे ४.३० वाजता केज रोडकडून येणारा एमएच ५५ सी ०३८९ क्रमांकाचा पांढऱ्या रंगाचा बोलेरो पिकअप अडवून तपासणी करण्यात आली.

वाहनाची तपासणी केली असता




त्यामध्ये ७ गोवंशीय बैल अत्यंत दाटीवाटीने, निर्दयीपणे बांधलेल्या अवस्थेत आढळून आले. जनावरांना उभे राहण्यासाठीही पुरेशी जागा नव्हती. तसेच चारा- पाणी न देता त्यांची वाहतूक करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. चालकाकडे जनावरांच्या वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी, वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा इतर कागदपत्रे नव्हती.

या प्रकरणी सलमान पाशा शेख (वय २२, रा. काळेगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर) आणि दिनेश माधव तिघोटे (वय २२, रा. ईदगाह रोड, बौदध नगर, अहमदपूर, जि. लातूर) यांच्याविरुद्ध प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६०, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, १९७६ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान अंदाजे १३.६० लाख किमतीची ७ गोवंशीय जनावरे व १५ लाख किमतीचा बोलेरो पिकअप असा एकूण ५८.६० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करण्यात आला असून जनावरांची पुढील व्यवस्था करण्यात आली आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार नागरगोजे करीत आहेत.

**दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई**

मुख्य कार्यालय- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७
ऑफिस पत्ता:- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई
फोन क्र. ०२४४६-२४६९२७

जा.क्र. दीन/मु.का./वसुली/०२/७००२-१२८०/४३/२०२६-२७ दिनांक- ३०.०६.२०२६

परिशिष्ट ४ अ
नियम ८ व ९ नुसार

**मालमत्ता विक्रीची सुचना**

विक्री नोटीस (अचल मालमत्ता)

सिक्युरिटायझेशन आणि सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत नियम ८ व ९ नुसार या नोटीसद्वारे सर्वसाधरण लोकास तसेच कर्जदार व सहकर्जदार/गहाणदार व जामीनदार यांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली अचल मालमत्तेचे गहाणखत बँकेच्या नावे कर्जाची परतफेड करण्याची हमी देवुनही **१.कर्जदार** मे. मैत्री एजन्सीज् प्रोप्रा. चैतन्य सुधाकर माने (कर्जदार) **पत्ता:-** अजिंक्यतारा निवास, पिताजी सारडा नगरी, जोगाईवाडी,ता.अंबाजोगाई जि.बीड ४३१ ५१७ **२.जामीनदार** प्रताप योगीराज निकम **पत्ता:-** सायगाव नाका, पोखरी रोड, अंबाजोगाई, जि.बीड ४३१ ५१७ **३.जामीनदार** रणजित अनिल मंगे **पत्ता:-** रेणुका मेडीकल आणि जनरल स्टोअर्स, प्रशांत नगर, अंबाजोगाई, जि. बीड ४३१ ५१७

सदर कर्जदार/गहाणदार यांनी दिनांक **०५.०८.२०२०** रोजी दस्त क्रं.२८४३/२०२० रु.५,००,०००/-(अक्षरी रु.:- पाच लाख रु. फक्त) चे गहाणखत बँकेच्या नावे करुन दिले आहे. निम्न लिखीत **मालमत्तेचा ताबा दिनांक २७.०३.२०२६** रोजी घेतला आहे.

वर नमुद केलेल्या कायद्यांर्तगत नियमानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी, खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदाद्वारे विक्री करण्याकरीता नोटीस देत आहे. बँकेनी खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरिता सिल बंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. दिनांक **३१.०५.२०२६** रोजी थकीत रक्कम **रु.६,४३,६५२/-(अक्षरी रु.सहा लाख त्रेचाळीस हजार सहाशे बावन्न रु.)** अधिक पुढील व्याज व इतर खर्च बाकी असलेल्या वसुली करिता निविदा मागविण्यात येत आहे.

ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निवीदा प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** या पत्यावर सिलबंद पाकीटमध्ये अनामत रक्कम राशी रु.५०००/- प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा **मुख्यशाखा-अंबाजोगाई** यांच्या नावे असलेला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर जोडुन दिनांक १६.०७.२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**गहाण मालमत्तेचा तपशील:-**

श्री. चैतन्य सुधाकर माने गहाणदार/कर्जदार यांचे मौजे जोगाईवाडी ता.अंबाजोगाई, जि.बीड येथील घर क्र.५२२७ ज्यांचा प्लॉट क्र.४० (उत्तरबाजु) जागा सर्वे क्र.३३४ क्षेत्रफळ पुर्व-पश्चिम १५ मी. दक्षिण उत्तर पुर्व बाजु २.७० मी. दक्षिण उत्तर पश्चिम बाजु ३.२ मी. एकुण ४४.२५ स्वे.मी. ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-

**पुर्व:-** प्लॉट क्र.४१
**पश्चिम:-** ९ मी. रस्ता
**दक्षिण:-** संगिता पवार यांचा प्लॉट क्र.४० चा भाग
**उत्तर:-** प्लॉट क्र.३९
(वरील मालमत्ता "जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत")

**१.मालमत्ता राखीव किंमत रु.७,६५,०००/-(अक्षरी रु.: सात लाख पासष्ट हजार रु फक्त)**

**२.अनामत रक्कम रु.५०००/- (अक्षरी रु.:-**पाच हजार फक्त).

**क्रीच्या शर्ती व अटी:-**

१. इच्छुक खरेदीदारांना कोरे निविदा पत्र रु.१००/- (अक्षरी रु.- शंभर रु. फक्त)अधिक जीएसटी नगदी अथवा डिमांड ड्राफ्ट ने जमा करुन बँकेच्या शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** शाखेतुन प्राप्त करता येईल.
२. ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या मोहरबंद निविदा सुरक्षा राशी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु. फक्त) (डिमांड ड्राफ्ट/नगदी स्वरुपात/ACCOUNT TRANSFER/ अधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या नावाचा) सह बँकेच्या शाखा कार्यालय, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** येथे दिनांक १६.०७.२०२६ सायं.०५.०० पर्यंत जमा कराव्यात.
३. मोहरबंद निविदा विहीत सुरक्षा राखी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु फक्त) नसल्यास जमा केलेल्या निविदा तात्काळ रद्द करण्यात/समजण्यात येतील.
४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व मोहरबंद निवीदा दिनांक १७.०७.२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता बँकेच्या शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** येथे उघडण्यात येतील.
५. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल व तो/ती/ते तसे न करु शकल्यास इतर सक्षम खरेदीदारास सदर मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार प्राप्त होईल व अशा खरेदीदारास सुध्दा बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल.
६. जर यशस्वी निवीदा धारकाने निवीदा रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा केली नाही तर यशस्वी निवीदा धारकांची अनामत रक्कम जप्त करणे अथवा परत करणे हा अधिकार अधिकृत अधिकारी राखुन ठेवीत आहेत.
७. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेची उर्वरित ७५ टक्के रक्कम त्यापासुन १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. जर १५ वा दिवस हा सुट्टीचा दिवस असेल तर त्याच्या दुस-या दिवशी पर्यंन्तचा दिवस विहीत कालावधी समजण्यात येईल.
८. सदर मालमत्तेवर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा, कर, ई. वा इतर देणे बाकी असल्यास त्याची खालील हस्ताक्षराकर्तास कल्पना नाही व अशी सर्व रक्कम यशस्वी खरेदीदारांसच द्यावी लागेल व त्यास खालील हस्ताक्षरकर्ता अधिकारी जबाबदार राहणार नाही.
९. अधिकृत अधिकारी कुठलेही कारण न देता बोली/निविदा स्विकार/अस्विकार करण्याचा तसेच विक्रीची कारवाई तहकुब/स्थगीत रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवीत आहे. या दरम्यान अधिकृत अधिकारी यांच्याकडे भरणा केलेल्या रक्कमेवर कुठलेही व्याज दिले जाणार नाही.
१०. मालमत्ते संदर्भातील चौकशी करीता बँकेच्या शाखा कार्यालय, **मुख्यशाखा-अंबाजोगाई** वेळ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत संपर्क करता येईल तसेच अधिकृत अधिकारी यांना दुरध्वनी क्र. ७६६६५७७९९०० पत्ता शाखा-**मुख्यशाखा-अंबाजोगाई** मो.क्र.९०४९९९८२६८ वर सुध्दा संपर्क साधता येईल.
११. नियमाप्रमाणे विक्रीपत्रा करीता लागणारा मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर सर्व खर्च यशस्वी खरेदीदारास/बोलीकर्त्यासच करावा लागेल.
१२. सदर मालमत्तेवर कर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष देणे निघाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

स्थळ:- मुख्यशाखा-अंबाजोगाई
दिनांक:-३०.०६.२०२६

अधिकृत अधिकारी,
(सिक्युअर्ड क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मो. ७६६६५७७९९००

**विशेष वसुली अधिकारी, अंबाजोगाई यांचे कार्यालय,**
द्वारा दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मुख्य कार्यालय,बस डेपो शेजारी,परळी-रोड, अंबाजोगाई-४३१ ५१७
जा.क्र/ दीन /वि.वसुली/२/७००२-११८८/गजानन कलेक्शन/**६६**/२०२६-२७
**दिनांक :-** ०१.०७.२०२६

**"नमुना झेड"**
[नियम १०७ पोट-नियम (११ (ड-११) पहा)]
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी श्री.महेश रामराव ताथोडे, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ अन्वये असून १५.०४.२०२४ रोजी मागणीची नोटीस ऋणको मे.गजानन कलेक्शन प्रोप्रा. शिवाजी मनोहर शिंदे यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.८,०९,८०२/- (अक्षरी: आठ लाख नऊ हजार आठशे दोन रु. फक्त) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे.

खाली सही करणाऱ्याने दिनांक २६.०५.२०२५ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.
ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधिल नियम १०७ (११ (ड-१)) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या दि. २०/०६/२०२६ दिवशी सन-२०२६-२७ वर्षी ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास **विशेष वसुली अधिकारी,द्वारा दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई** यांच्या बोजाची खाते क्र.टीएल-११८२ चे एकुण रु.८,००,०००/-(अक्षरी: आठ लाख रु.फक्त) रक्कम आणि त्यावरील व्याज याला अधीन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मे.गजानन कलेक्शन प्रोप्रा. शिवाजी मनोहर शिंदे यांच्या कर्ज प्रकरणातील जामीनदार श्री. त्रिबंक मनोहर शिंदे यांची मौजे वाघोली पो.आडस ता. धारुर,जि.बीड येथील सर्वे नं.१२ मधील ३१ आर जमीन ज्यांच्या चतु:सिमा खालील प्रमाणे-

**पूर्वेस** :- **सखाराम कारभारी शिंदे.**
**पश्चिमेस** :- **दगडु मारोती शिंदे.**
**दक्षिणेस** :- **अर्जुन गव्हाणे.**
**उत्तरेस** :- **अंबाजोगाई-धारुर रोड**

**दिनांक :- ०१.०७.२०२६**
**ठिकाण:- मौजे वाघोली पो. आडस, ता. धारुर,जि.बीड**

**विशेष वसुली अधिकारी**
**(महेश रामराव ताथोडे)**

**विशेष वसुली अधिकारी, अंबाजोगाई यांचे कार्यालय,**
द्वारा दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मुख्य कार्यालय,बस डेपो शेजारी,परळी-रोड, अंबाजोगाई-४३१ ५१७
जा.क्र/ दीन /वि.वसुली/२/७००२-११८८/गजानन कलेक्शन/**६७**/२०२६-२७
**दिनांक :-** ०१.०७.२०२६

**"नमुना झेड"**
[नियम १०७ पोट-नियम (११ (ड-११) पहा)]
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी श्री.महेश रामराव ताथोडे, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ अन्वये असून १५.०४.२०२४ रोजी मागणीची नोटीस ऋणको मे.गजानन कलेक्शन प्रोप्रा. शिवाजी मनोहर शिंदे यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.८,०९,८०२/- (अक्षरी: आठ लाख नऊ हजार आठशे दोन रु. फक्त) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे.

खाली सही करणाऱ्याने दिनांक २६.०५.२०२५ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.
ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधिल नियम १०७ (११ (ड-१)) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या दि. २०/०६/२०२६ दिवशी सन-२०२६-२७ वर्षी ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास **विशेष वसुली अधिकारी,द्वारा दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई** यांच्या बोजाची खाते क्र.टीएल-११८२ चे एकुण रु.८,००,०००/-(अक्षरी: आठ लाख रु.फक्त) रक्कम आणि त्यावरील व्याज याला अधीन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मे.गजानन कलेक्शन प्रोप्रा. शिवाजी मनोहर शिंदे यांच्या कर्ज प्रकरणातील जामीनदार श्री. त्रिबंक मनोहर शिंदे यांची मौजे वाघोली पो.आडस ता. धारुर,जि.बीड येथील सर्वे नं.१४ मधील २५ आर जमीन ज्यांच्या चतु:सिमा खालील प्रमाणे-

**पूर्वेस** :- **दगडु मारोती शिंदे.**
**पश्चिमेस** :- **विष्णु कारभारी शिंदे.**
**दक्षिणेस** :- **अंबाजोगाई-धारुर रोड.**
**उत्तरेस** :- **साहेबा थोरात**

**दिनांक :- ०१.०७.२०२६**
**ठिकाण:- मौजे वाघोली पो. आडस, ता. धारुर,जि.बीड**

**विशेष वसुली अधिकारी**
**(महेश रामराव ताथोडे)**

**विशेष वसुली अधिकारी, अंबाजोगाई यांचे कार्यालय,**
द्वारा दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
मुख्य कार्यालय,बस डेपो शेजारी,परळी-रोड, अंबाजोगाई-४३१ ५१७
जा.क्र/ दीन /वि.वसुली/२/७००२-११८८/गजानन कलेक्शन/**६८**/२०२६-२७
**दिनांक :-** ०१.०७.२०२६

**"नमुना झेड"**
[नियम १०७ पोट-नियम (११ (ड-११) पहा)]
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेला वसुली अधिकारी श्री.महेश रामराव ताथोडे, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम,१९६१ अन्वये असून १५.०४.२०२४ रोजी मागणीची नोटीस ऋणको मे.गजानन कलेक्शन प्रोप्रा. शिवाजी मनोहर शिंदे यांना देऊन नोटीशीमध्ये नमूद केलेली रक्कम रु.८,०९,८०२/- (अक्षरी: आठ लाख नऊ हजार आठशे दोन रु. फक्त) सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे.
खाली सही करणाऱ्याने दिनांक २६.०५.२०२५ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.
ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला/तिला महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ मधिल नियम १०७ (११ (ड-१)) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या दि. २०/०६/२०२६ दिवशी सन-२०२६-२७ वर्षी ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास **विशेष वसुली अधिकारी,द्वारा दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई** यांच्या बोजाची खाते क्र.टीएल-११८२ चे एकुण रु.८,००,०००/-(अक्षरी: आठ लाख रु.फक्त) रक्कम आणि त्यावरील व्याज याला अधीन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

मे.गजानन कलेक्शन प्रोप्रा. शिवाजी मनोहर शिंदे यांच्या कर्ज प्रकरणातील जामीनदार श्री. त्रिबंक मनोहर शिंदे यांची मौजे वाघोली पो.आडस ता. धारुर,जि.बीड येथील सर्वे नं.४७ मधील ४१ आर जमीन ज्यांच्या चतु:सिमा खालील प्रमाणे-

**पूर्वेस** :- **दगडु मारोती शिंदे.**
**पश्चिमेस** :- **तात्या कुलकर्णी.**
**दक्षिणेस** :- **बंन्सी थोरात.**
**उत्तरेस** :- **अश्रुबा लाखे**

**दिनांक :- ०१.०७.२०२६**
**ठिकाण:- मौजे वाघोली पो. आडस, ता. धारुर,जि.बीड**

**विशेष वसुली अधिकारी**
**(महेश रामराव ताथोडे)**

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यात प्रत्यक्ष मतदार पडताळणी सुरू, एसआयआर मोहीमेसाठी प्रशासन सज्ज

## दिव्यांग, तृतीयपंथी आणि आदिवासीसाठी विशेष मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

जिल्ह्यात विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रत्यक्ष मतदार पडताळणीची मोहीम आज मंगळवार (दि.३०) पासून सुरू झाली आहे. जिल्हा प्रशासनाकडून यंदा दिव्यांग, तृतीयपंथी आणि आदिवासी मतदारांसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करतील. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व बीएलओंना मागील आठवडाभरापासून प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिली. एसआयआरचा मुख्य उद्देश पात्र मतदारांची नावे मतदार यादीत कायम ठेवणे आणि अपात्र मतदारांची नावे वगळणे हा आहे. यासाठी बीएलओ प्रत्येक मतदाराला दोन अर्ज देतील. त्यापैकी एका अर्जावर बीएलओची स्वाक्षरी असेल. हा अर्ज पुरावा म्हणून मतदार स्वतःकडे ठेवू शकतील. अर्ज हरवू नयेत किंवा त्यांची अदलाबदल होऊ नये यासाठी ही व्यवस्था करण्यात आली असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

या प्रक्रियेत प्रत्येक अर्जावर स्वतंत्र क्यूआर कोड देण्यात आला असून, त्याद्वारे संबंधित मतदाराची ओळख आणि माहिती सहज पडताळता येणार आहे. मतदारांची माहिती २००२ मधील नोंदी तसेच अद्ययावत २०२५-२६ च्या मतदार यादीतील नोंदींशी पडताळली जाणार आहे. या नोंदींशी ज्यांची माहिती जुळेल, त्यांना कोणतीही नोटीस दिली जाणार नाही किंवा सुनावणीसाठी कार्यालयात जाण्याची आवश्यकता भासणार नाही. मात्र, ज्यांची पूर्वीची माहिती उपलब्ध नसेल, त्यांनी आई-वडील, आजी-आजोबा किंवा इतर नातेवाईकांची पूर्वीच्या मतदार यादीतील नोंद सादर करणे आवश्यक राहील. अर्जामध्ये मतदाराचे नाव, मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदार ओळख क्रमांक, आई-वडील किंवा नातेवाईकांचे नाव, त्यांच्याशी असलेले नाते, विधानसभा मतदारसंघ, भाग क्रमांक आणि अनुक्रमांक यांची माहिती भरावी लागणार आहे.

एसआयआर मोहिमेदरम्यान एखाद्या मतदाराचे नाव शहर आणि ग्रामीण भाग अशा दोन ठिकाणी असल्यास संबंधित मतदाराला दोन्ही ठिकाणी नोटीस बजावली जाईल. त्यानंतर सुनावणी घेऊन एका ठिकाणचेच नाव मतदार यादीत कायम ठेवले जाईल. जर मतदाराने दुबार नावाची माहिती दिली नाही, तर बीएलओ ॲपच्या माध्यमातून ती माहिती समोर येईल. त्यामुळे दुबार नावे असलेल्या मतदारांनी खरी व अचूक माहिती देणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी स्पष्ट केले.

३० जून ते २९ जुलै – घरोघरी जाऊन अर्जांचे वाटप, ५ ऑगस्ट – प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर – हरकती व सूचना स्वीकारण्याची मुदत, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर – हरकतींवरील प्रत्यक्ष सुनावणी, ७ ऑक्टोबर – अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

डाटा एन्ट्रीमधील चुका टाळण्यासाठी आणि पडताळणीची प्रक्रिया अधिक वेगवान करण्यासाठी प्रत्येक अर्जावर स्वतंत्र क्यूआर कोड देण्यात आला आहे. या क्यूआर कोडमध्ये मतदाराचे नाव, मतदार ओळख क्रमांक, पत्ता, अनुक्रमांक, मतदान केंद्र, भाग क्रमांक, विधानसभा व लोकसभा मतदारसंघ तसेच राज्याची माहिती पूर्वमुद्रित स्वरूपात उपलब्ध असेल. त्यामुळे माहितीची अचूकता राखण्यास आणि पडताळणी जलद करण्यास मदत होणार आहे.

मतदार यादीतील नाव शोधा; ईसीआयएनईटी ॲपचा करा वापर- भारत निवडणूक आयोगाने विकसित केलेले एउखछएढ हे ॲप प्ले स्टोअरवर मोफत उपलब्ध आहे. हे ॲप डाउनलोड करून २००२ च्या मतदार यादीतील स्वतःचे किंवा आपल्या नातेवाईकांचे नाव सहजपणे शोधता येते. नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेऊन ईसीआयएनईटी ॲपचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# शेतकरी कर्जमुक्तीचा लाभ मिळवण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी करा

## जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**



राज्य शासनाने शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून मुक्त करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे जवळपास एक हजार शेतकरी पात्र आहेत. तसेच राष्ट्रीयकृत व इतर बँकातील पात्र शेतकऱ्यांची यादी अद्ययावत करण्याचे काम राज्य स्तरावर वेगाने सुरु असून, जिल्ह्यातील मोठ्या प्रमाणावर शेतकरी या योजनेस पात्र ठरणार आहेत. त्यामुळे सर्व पात्र शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी करणे अनिवार्य असल्याचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले आहे.

प्राप्त माहितीनुसार,जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील पात्र शेतकऱ्यांपैकी १७० शेतकऱ्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही. या शेतकऱ्यांची यादी संबंधित संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून, संबंधितांनी तातडीने नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

ॲग्रीस्टॅक नोंदणी न झाल्यास पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी विलंब न करता आपल्या जवळच्या सेतू सुविधा केंद्रात जाऊन आवश्यक कागदपत्रांसह ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

तसेच, ज्या प्रकरणांमध्ये खातेदार शेतकरी मयत झाले आहेत, अशा ठिकाणी त्यांच्या वारसांच्या नावाची सातबाऱ्यावर आवश्यक नोंद (फेरफार) करून घेणे अत्यावश्यक आहे. वारस नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच संबंधित लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळू शकणार असल्याने ही प्रक्रिया देखील तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचावा, यासाठी महसूल, कृषी व संबंधित यंत्रणा समन्वयाने कार्यरत असून, पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले आहे.

# गांगलवाडी येथे पूल नसल्यामुळे नदी ओलांडून विद्यार्थी शाळेत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**



गांगलवाडी परिसरातील विद्यार्थ्यांना पूल नसल्यामुळे दररोज जीव धोक्यात घालून पाण्यातून शाळेत जावे लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात ही समस्या अधिक गंभीर बनत असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने तातडीने पूल मंजूर करून बांधकाम करावे, अशी मागणी विद्यार्थी आणि पालकांमधून होत आहे.

संत नामदेव प्राथमिक आश्रम शाळा तसेच रतनसिंग नाईक माध्यमिक आश्रम शाळा, गांगलवाडी येथे शिक्षण घेणारे विद्यार्थी दररोज ओढ्यातून ये-जा करतात. पावसाळ्यात पाण्याची पातळी वाढल्याने विद्यार्थ्यांना मोठा धोका निर्माण होतो. अनेक वेळा शाळेत जाणेही अशक्य होते.

इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कु. कोमल ज्ञानेश्वर राठोड हिने सांगितले की, पूल नसल्यामुळे आम्हाला पाण्यातून शाळेत जावे लागते. पावसाळ्यात भीतीच्या वातावरणात प्रवास करावा लागतो. शासनाने आमच्या सुरक्षिततेचा विचार करून तातडीने पूल मंजूर करावा.

या मागणीला इयत्ता दहावीचे विद्यार्थी वेदांत देवराव जाधव आणि प्रांजल गजानन पवार यांनीही पाठिंबा दिला आहे. या पुलाचा लाभ ढेगज, सिधेश्वर, गांगलवाडी, नंदगाव जाभळी तांडा, वडचुना, दुडचुना, ढेगज तांडा, दुधाळा, दुधाळा तांडा, सांवगी, ब्राम्हणवाडा, सुकापूर, सावळी, सावळी तांडा आणि कार्शी तांडा येथील विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनाही होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन शासनाने तातडीने पूल मंजूर करून कामाला सुरुवात करावी, अशी एकमुखी मागणी परिसरातील विद्यार्थी व पालकांकडून होत आहे.



**हिंगोली- श्रीक्षेत्र संत गजानन महाराज दिंडीचे सेनगाव तालुक्यातील वाढोणा येथे आगमन झाले असता दिंडीसोबत असलेला घोड्याची पूजा करण्यासाठी महिला भाविकांनी मोठी गर्दी केली होती. छाया-सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### नालीवरील धापे तुटले, अपघाताची शक्यता



हिंगोली- शहरातील माणिक स्मारक तसेच सरजूदेवी भिकुलाल भारुका या शाळेसमोरील तसेच ग्रामीण पोलीस स्टेशन, शहर पोलीस स्टेशन, पेट्रोल पंप समोरील सिमेंट रस्त्यालगत असलेल्या नाली वरील ढापे जागोजागी तुटलेल्या अवस्थेत दिसत आहेत या नाल्यावरील तुटलेल्या ढाप्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही परंतु तरीही शाळेतील लहान मुलं-मुली याच रस्त्यावरून ये-जा करत असतात अपघात झाल्यास एखाद्याचा जीव सुद्धा जाऊ शकतो. या नालीवरील तुटलेल्या धाप्याची व्यवस्था प्रशासनाच्या वतीने लवकरात लवकर करण्यात यावी. जेणेकरून भविष्यात एखादी दुर्घटना टाळू शकता येते.

### पोलिस अधीक्षक श्रेणीक यांचा सत्कार



हिंगोली- विराट राष्ट्रीय लोकमंच कौन्सिलच्या वतीने हिंगोली नूतन पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष शेख नईम शेख लाल, राष्ट्रीय संचालक शेख नौमान नवेद नईम, जिल्हाध्यक्ष शेख बासित, पठाण साजिद खान, जिल्हा प्रमुख शेख शाहनवाज हुसेन, जिल्हा महासचिव सतीश लोणकर, सचिव राजकुमार जावळे, पठाण रौफ खान, पठाण युसूफ खान उर्फ गुड्डू, शेख अफरोज, शेख नफिस पहेलवान, जुबेर खान आदी पदाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.



हिंगोली- न्यायालयाच्या आदेशानंतर शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक देवेंद्रसिंह ठाकूर यांनी संबंधित दुचाकी वाहन मालकाच्या स्वाधीन केले. छाया- लखन यादव

# हिंगोली जिल्ह्यात श्री संत गजानन महाराज पालखीचे जंगी स्वागत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**

मराठवाडा आणि विदर्भाच्या सीमेवर असलेल्या वाढोणा येथे दि १ जुलै रोजी शेगाव येथील श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे आगमन झाले यावेळी पालखीचे जंगी स्वागत करण्यात आले. वारकऱ्यांचेही स्वागत करण्यात आले. दिंडी सोहळ्यामुळे परिसरातील वातावरण भक्तीमय झाले होते.

यावेळी भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, माजी सभापती संजय देशमुख यांच्यासह भाविकांनी दिंडीचे पूजन करून मराठवाड्यात स्वागत केले. यावेळी सेनगाव, गोरेगाव पोलिसांच्या पथकाने स्वागत करून चोख पोलिस बंदोबस्त दिला. आरोग्य विभागाचे पथकही यावेळी तैनात होते. दि २ जुलै रोजी दिंडीचा मुक्काम हिंगोली तालुक्यातील कऱ्हाळे डिग्रस, ३ जुलै रोजी जवळा बाजार येथे असणार आहे.



यावेळी मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती होती. श्रीक्षेत्र शेगाव येथील श्री संत गजानन महाराज यांच्या पायी दिंडी सोहळ्याचे आज मराठवाड्यात वाढोणा येथे आगमन झाले.



सकाळपासूनच परिसरातील भाविक दिंडीच्या स्वागतासाठी उपस्थित होते. सकाळी ७ वाजता दिंडी सोहळ्याचे मराठवाड्यात आगमन होताच गण गण गणात बोते, जय जय रामकृष्ण हरी च्या गजरात निघालेल्या या दिंडीचे वाढोणा शिवारात आगमन झाल्यानंतर भाविकांनी हरिनामाचा गजर केला. या दिंडी सोहळ्यात खांद्यावर भगवी पताका घेवून ७०० वारकरी सहभागी झाले आहेत. या

# सार्वजनिक बांधकामच्या कार्यकारी अभियंतापदी सुरेश जोशी रूजू

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**



हिंगोली जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता पदाचा पदभार सुरेश कांतराव जोशी यांनी आज अधिकृतपणे स्वीकारला. पदभार स्वीकारल्यानंतर कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊनस्वागत केले.

पदभार स्वीकारताच जोशी यांनी जिल्ह्यातील रखडलेली रस्ते विकास कामे, शासकीय इमारतींचे बांधकाम आणि पायाभूत सुविधांचा दर्जा सुधारण्याला आपले प्राधान्य राहील, अशी ग्वाही दिली. तसेच, सर्व कामे विहित मुदतीत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. नवीन पदभार स्वीकारल्याबद्दल सुरेश कांतराव जोशी यांचा विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती आणि कंत्राटदारांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रामुख्याने उपस्थित मिलिंद चिद्रावार, चंद्रकांत कलटवार, वसंत मुळे, मयूर कयाल, ए. आर. खान यांनी नवनियुक्त कार्यकारी अभियंता जोशी यांना पुष्पगुच्छ देऊन पुढील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम विभागातील अन्य अधिकारी, कर्मचारी आणि जिल्ह्यातील कंत्राटदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. जोशी यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील विकासकामांना अधिक गती मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त औंढा पंचायत समितीत कृषी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ जुलै**



औंढा येथील पंचायत समितीमध्ये हरित क्रांतीचे प्रणेते तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली. प्रारंभी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास सहाय्यक गटविकास अधिकारी अनंता घोरपडे, पंचायत समितीचे कृषी अधिकारी सुभाष पाचपुते, तालुका कृषी अधिकारी शिवप्रसाद संघेकर, मंडळ कृषी अधिकारी किशोर शेळके, प्रशासन अधिकारी राधेश्याम परांडकर उपस्थित होते.

यावेळी शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर पंचायत समिती प्रांगणामध्ये विविध प्रजातीच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी कृषी विस्तार अधिकारी जितेंद्र सोनटक्के, कृषी विस्तार अधिकारी प्रताप गाडे,विस्तार अधिकारी सय्यद जमीर, विस्तार अधिकारी शेषराव आमले, तुळशीराम कोकरे, कृषी विभागाचे करण पवार, गोविंद भोजे, विजय संघई, वैद्यनाथ रनेर, राजेश भिसे, संगीता कीर्तने, संजय घोंगडे, प्रणिता वैद्य, अक्षय बगाटे, सीमा थोरात, जयश्री भाकरे, उदय देशपांडे, विशाल इंगोले, अभिजीत गायकवाड, राजेश सवनेकर, नितीन हजारे, भास्कर सिरसाट, मनोज कांबळे, शिवाजी टोम्पे, अनिल लांडगे, आनंद गायकवाड, पिराजी हाके, शेख नगमा यांच्यासह कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, पंचायत समिती मधील कर्मचारी, शेतकरी आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुलानेच केली मैत्रिणीच्या मदतीने घरातील ९ लाखाची चोरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ जुलै -**

घरातील मंडळी देवदर्शनाला गेल्याची संधी साधून घरफोडी करुन नऊ लाख ३६ हजार रुपयांची रक्कम चोरी करण्यात आली होती. या घरफोडीतील चोरट्यांना अटक करण्यात आली असून, मुद्देमाल देखील जप्त करण्यात आला आहे. दरम्यान हि चोरी फिर्यादीच्या मुलानेच मैत्रिणीच्या मदतीने केली असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

नायगाव येथील कौठेकर कुटुंबिय दि.२६ जून रोजी देवदर्शनासाठी गेले होते. हि संधी साधत त्यांच्या घरातील नऊ



लाख ३६ हजार ६०० रुपयांची रक्कम चोरी करण्यात आली. या प्रकरणात नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. नायगाव पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जलदगतीने या प्रकरणाचा तपास करुन दोन जणांना अटक केली असून यात एका अल्पवयीन बालिकेचा समावेश आहे. पोलिसांनी या आरोपीकडून नऊ लाख ३६ हजार ६०० रुपये रक्कम हस्तगत केली आहे. दरम्यान हि चोरी त्याच घरातील शुभम कौठेकर याने त्याच्या मैत्रिणीच्या मदतीने केली असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी सांगितले. तर दुसर्या घटनेत अर्धापूर व परळी ग्रामीण पोलीस ठाण्यातून ट्रॅक्टर चोरीचे गुन्हे उघड करुन सात लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकातील अंमलदार भोकर फाटा परिसरात गस्त घालत असताना एक इसम त्याच्या साथीदारासह ट्रॅक्टर हेड चोरी करत असल्याची गोपनिय माहिती मिळाली. या माहितीवरुन पोलिसांनी महेश आखात रा.सातोना जि.जालना यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता तो आणि त्याचा भाऊ विष्णू आखात याने नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर मालेगाव व अन्य ठिकाणाहून दोन ट्रॅक्टरचे हेड चोरल्याची कबुली दिली. या दोन्ही हेडची किंमत सात लाख ५० हजार रुपये असून हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केली असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षकांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांची उपस्थिती होती.

## करदात्यांना सुलभता प्राप्त व्हावी : सहआयुक्त रंजना देशमुख

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ जुलै -**

वस्तू व सेवा कर प्रणालीने देशात 'एक राष्ट्र, एक कर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली असून, गेल्या नऊ वर्षात कर प्रणालीत पारदर्शकता, सुलभता आणि कार्यक्षमता वाढीस लागली आहे. करदाते, व्यावसायिक आणि विभागीय अधिकारी-कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच ही वाटचाल यशस्वी ठरली आहे, असे प्रतिपादन नांदेड विभागाच्या राज्यकर सहआयुक्त सौ. रंजना विश्वास देशमुख यांनी या निमित्ताने केले आहे.

बुधवार १ जुलै २०२६ रोजी देशभरात ९ वा वस्तू व सेवा कर (जीएसटी) दिन साजरा होत असून यानिमित्ताने राज्यकर सहआयुक्त सौ. रंजना विश्वास देशमुख यांनी सर्व करदाते, सनदी लेखापाल, कर सल्लागार, लेखापाल तसेच विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्याने वस्तू व सेवा कर (जीएसटी) मधून रु. ३,५७,८९७ कोटी तर महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (चतढ) मधून रु. ५८,८५० कोटी असे मिळून एकूण रु. ४,१६,७४७ कोटी इतके महसूल संकलन केले असून, ही राज्यासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

## विद्या विकास शिक्षण संस्थेकडून सेवानिवृत्त शिक्षकांचा गौरव


**बाऱ्हाळी** - बाऱ्हाळी येथील विद्या विकास विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक पंचगट्टे, उपमुख्याध्यापक तानाजी दावलपुरे आणि प्रा. गंगाधर गडम सेवानिवृत्त झाल्याने संस्थेच्या वतीने एका कार्यक्रमातून त्यांनी केलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील सेवेचा गौरव व अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या. मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथील विद्या विकास शिक्षण संस्थेचा भक्कम पाया स्व. भाऊसाहेब देशपांडे



यांनी रचला असून, त्यांच्या दूरदृष्टीमुळे संस्था आज शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श घेत संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे या संस्थेचे व्यवस्थापन व्यवस्थितपणे सांभाळत आहेत. तसेच संस्थेच्या प्रगतीत सेवानिवृत्त शिक्षकांचेही मोलाचे योगदान राहिले असून, त्यांच्या कार्यामुळे संस्थेची शैक्षणिक परंपरा अधिक समृद्ध झाली आहे. संस्थेच्या नियमांचे पालन करत आपला सेवाकाळ यशस्वी केलेल्या अशोक पंचगट्टे , प्रा. गंगाधर गडम आणि तानाजी दावलपुरे यांचा मंगळवार दि. ३० जून रोजी विद्यालयाच्या प्रांगणात गौरव सेवापूर्ती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे या होत्या तर मल्हारराव देशपांडे , मुरारजी देशपांडे, राजन देशपांडे, शिवाजी गव्हाणे गुरुजी, व्यंकट पाटील उमाटे, हणमंत वाडीकर, प्रवीण काशेटवार, राजेश महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या निवृत्तीचा हा क्षण आनंदाचा असला तरी शाळा, विद्यार्थी आणि सहकाऱ्यांसाठी तो भावनिकही होता. त्यांनी कुशल नेतृत्वाने विद्यालयाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सर्वांगीण विकासाला नवी दिशा देऊन शिस्त, दूरदृष्टी, विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता आणि शिक्षकांशी जिव्हाळ्याचे संबंध यांमुळे संस्थेची वेगळी ओळख निर्माण केली. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी त्यांनी सातत्याने मेहनत घेतली आणि शिक्षकांमध्ये समन्वय राखत विद्यालयाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. या तिन्ही कर्मचाऱ्यांनी आपला प्रामाणिकपणा, निष्ठा, सेवाभाव आणि आदर्श कार्यपद्धतीने असंख्य विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले. त्यांनी केलेल्या योगदानाची संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे यांनी त्यांच्या कार्याची कौतूक व प्रशंशा करून सपत्नीक स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी संस्थेचे कर्मचारी, मित्रमंडळी, नातेवाईक , पालक , विद्यार्थी व मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले.

## विद्यार्थ्यांच्या जडणघडणीस वाहिले आयुष्य; यशवंत गायकवाड यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न

**नायगाव** -शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार असतो, या उक्तीची प्रचिती आपल्या प्रदीर्घ सेवाकाळातून देणारे नरसी येथील जीवन विकास प्राथमिक शाळेचे ज्येष्ठ शिक्षक यशवंत लालबा गायकवाड हे तब्बल ३९ वर्षे २० दिवसांची निष्ठावान, प्रामाणिक आणि विद्यार्थीहिताची शिक्षणसेवा पूर्ण करून मंगळवार, दि. ३० जून रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित



करण्यात आलेला गौरव सोहळा कृतज्ञता, सन्मान आणि भावनांनी ओतप्रोत भरलेल्या वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुखेड येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य गंगाधर कांबळे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून माजी समाजकल्याण सभापती सौ. कमलबाई गायकवाड, रघुनाथ गायकवाड, अर्जुन कांबळे, रामराव जाधव, रावसाहेब गायकवाड, बालाजी सावकार नारलावार, ज्येष्ठ पत्रकार तथा सहशिक्षक आनंदरावजी सूर्यवंशी, गोविंदराव टोकलवाड, मरूबाई भालके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक नंदकिशोर नरसीकर, शिक्षकवृंद, पालक, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून गायकवाड यांच्याविषयीचा स्नेह आणि आदर व्यक्त केला. यावेळी बोलताना ज्येष्ठ पत्रकार तथा सहशिक्षक आनंदराव सूर्यवंशी यांनी गायकवाड यांच्या ३९ वर्षांच्या प्रेरणादायी शैक्षणिक प्रवासाला उजाळा दिला. मुस्लिमबहुल परिसरातील या शैक्षणिक संकुलाने केवळ गुणवंत विद्यार्थीच नव्हे, तर शिस्त, संस्कार आणि सामाजिक मूल्यांची जपणूक करणारी पिढी घडविली असून, त्यामध्ये गायकवाड यांच्यासह सर्व शिक्षक व महिला सहशिक्षिकांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रेमळ, मितभाषी, संयमी आणि मनमिळावू व्यक्तिमत्त्व लाभलेल्या गायकवाड यांची शिक्षणसेवा भावी शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. सत्काराला उत्तर देताना यशवंत गायकवाड यांनी शाळा, सहकारी शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी दिलेल्या प्रेम, विश्वास आणि सहकार्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी केलेले कार्य हेच आपल्या सेवाकाळातील सर्वात मोठे समाधान असल्याचे सांगताना त्यांच्या भावना उपस्थितांनाही भावूक करून गेल्या. यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पहार आणि स्मृतिचिन्ह देऊन यशवंत गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना भावपूर्ण निरोप देत त्यांच्या निरोगी, आनंदी आणि दीर्घायुषी आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विशेष म्हणजे, यशवंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी आज डॉक्टर, अभियंता, शिक्षक तसेच विविध शासकीय व खासगी क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या कार्याचा हा खरा गौरव असून, त्यांच्या ज्ञानसेवेचा ठसा अनेक पिढ्यांच्या आयुष्यात कायम स्मरणात राहणार आहे.

# तक्रारी व माहिती अधिकार अर्जांचा वाढता भडीमार; प्रशासन चिंतेत

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. १ जुलै -**

नायगाव, बिलोली, देगलूर, मुखेड, धर्माबाद व उमरी तालुक्यांतील विविध शासकीय कार्यालयांविरोधात वारंवार तक्रारी, निवेदने आणि माहिती अधिकार कायद्यांतर्गत अर्ज दाखल करण्याचे प्रमाण वाढल्याने प्रशासनात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. काही प्रकरणांमध्ये वस्तुस्थितीची पडताळणी होण्यापूर्वीच अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात येत असल्याची चर्चा असून, त्यामुळे अनेक अधिकारी मानसिक तणावाखाली काम करीत असल्याचे सांगितले जात आहे.

तहसील कार्यालय, पंचायत समिती, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, ग्रामपंचायती तसेच इतर शासकीय कार्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर तक्रारी आणि माहिती अधिकाराचे अर्ज दाखल होत आहेत. तक्रार करणे व माहिती अधिकाराचा वापर करणे हा नागरिकांचा




कायदेशीर अधिकार असला, तरी काही व्यक्तींकडून या अधिकाराचा कथित गैरवापर करून अधिकाऱ्यांवर दबाव आणण्याचे प्रकार वाढल्याची चर्चा प्रशासनात आहे.

अनेक तक्रारींमध्ये भ्रष्टाचार, आर्थिक गैरव्यवहार किंवा कामकाजातील अनियमिततेचे आरोप करण्यात येतात. मात्र, चौकशीनंतर त्यापैकी अनेक तक्रारींमध्ये तथ्य आढळत नसल्याचे संबंधित अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे आतापर्यंत दाखल झालेल्या तक्रारींपैकी किती तक्रारी सत्य ठरल्या आणि किती फेटाळल्या गेल्या, याची जिल्हास्तरावर निष्पक्ष छाननी करून माहिती जाहीर करावी, अशी मागणी नागरिकांमधून पुढे येत आहे.

काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले की, तक्रार दाखल झाल्यानंतर काही जणांकडून दूरध्वनीवरून दबाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याच्या तक्रारी आहेत. यासंदर्भात काही ऑडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचाही दावा करण्यात आला आहे. मात्र, या दाव्यांना अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

माहिती अधिकाराचे अर्ज दाखल झाल्यानंतर माहिती उपलब्ध होण्यापूर्वीच वारंवार संपर्क साधून माहितीची मागणी करणे, कार्यालयीन प्रक्रियेवर दबाव आणणे, अशा प्रकारांमुळे नियमित कामकाजावर परिणाम होत असल्याचेही काही अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, प्रामाणिकपणे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनाही अशा तक्रारींमुळे चौकशा, मानसिक तणाव आणि प्रतिमेला धक्का सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यामुळे माहिती अधिकार कायद्याचा कथित गैरवापर, खोट्या तक्रारी आणि दबावतंत्राच्या प्रकारांची सखोल चौकशी करून आवश्यक त्या प्रकरणांत कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी नायगाव, बिलोली, देगलूर, मुखेड, धर्माबाद व उमरी तालुक्यांतील सर्व तक्रारी, माहिती अधिकार अर्ज आणि त्यावरील अंतिम निर्णयांचा आढावा घेऊन किती तक्रारींमध्ये तथ्य आढळले व किती तक्रारी निराधार ठरल्या याची माहिती जनतेसमोर मांडावी. तसेच जाणीवपूर्वक खोट्या तक्रारी करून प्रशासनावर अनावश्यक ताण निर्माण करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी नागरिक आणि संबंधित विभागांकडून करण्यात येत आहे.

## दोन महिन्याचे बाळ ठेवून महिला प्रसार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ जुलै -**

येथील रेल्वे स्थानकावर दोन महिन्याची बाळ ठेवून एक अनोळखी महिला प्रसार झाल्याची घटना दिनांक ३० जून रोजी दुपारी तीन च्या सुमारास घडली.

दिनांक २६ जून रोजी अंदाजे साडे फूट साडेपाच फूट उंचीची २५ वर्षीय सडपातळ बांध्याची एक महिला रेल्वे स्थानकाच्या फलट क्रमांक एक एक वरील प्रतीक्षालयात स्त्री जातीचे दोन महिन्याचे बाळ ठेवून प्रसार झाले असून या महिलेची प्रसार झाली असून याप्रकरणी स्टेशन प्रबंधक आशुतोषकुमार प्रभाकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रेल्वे पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असुन महिलेसंबंधी माहीती असल्यास रेल्वे पोलीसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## इस्लापूरच्या मध्यवर्ती ठिकाणीच अप्पर तहसील कार्यालय उभारण्याची जोरदार मागणी

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १ जुलै -**

इस्लापूर येथे प्रस्तावित अप्पर तहसील कार्यालयाच्या जागेच्या निवडीचा प्रश्न ऐरणीवर आला असताना, कार्यालय गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या ग्रामपंचायतसमोरील जिल्हा परिषद भांडारगृहाच्या उपलब्ध जागेतच उभारण्यात यावे, अशी ठाम आणि एकमुखी मागणी इस्लापूर येथील नागरिकांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली. यावेळी सविस्तर निवेदन सादर करत नागरिकांच्या हिताचा निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, अप्पर तहसील कार्यालय हे हजारो नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामकाजाचे केंद्र असणार आहे. त्यामुळे त्याचे स्थान सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांगांना सहज पोहोचता येईल अशा मध्यवर्ती भागात असणे अत्यंत आवश्यक आहे. ग्रामपंचायतसमोरील जिल्हा परिषद भांडारगृहाची उपलब्ध जागा ही बाजारपेठ, सार्वजनिक वाहतूक आणि इतर शासकीय कार्यालयांच्या जवळ असल्याने या ठिकाणी अप्पर तहसील कार्यालय उभारल्यास नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची मोठ्या प्रमाणात बचत होईल. भविष्यात वाढणाऱ्या प्रशासकीय गरजांच्या दृष्टीनेही ही जागा सर्वाधिक उपयुक्त असल्याचे निवेदनात अधोरेखित करण्यात आले. नागरिकांनी स्पष्टपणे नमूद केले की, कार्यालय गावाबाहेर किंवा दुर्गम ठिकाणी उभारण्यात आल्यास सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागेल. वारंवार प्रवास, अतिरिक्त खर्च आणि वेळेचा अपव्यय होण्याबरोबरच काही मध्यस्थांकडून नागरिकांची आर्थिक पिळवणूक होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे शासनाच्या लोकाभिमुख आणि पारदर्शक प्रशासनाच्या उद्दिष्टाला अनुसरूनच जागेची निवड व्हावी, अशी मागणी करण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांचे निवेदन स्वीकारून विषयाचा सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

## विद्यापीठात वसंतराव नाईक जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ जुलै -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्ष येथे आज बुधवार, दि.०१ जुलै, २०२६ रोजी वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे कुलगरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र-कुलगरू डॉ. अशोक महाजन, अधिष्ठाता डॉ.एम.के. पाटील, वित्त व लेखाधिकारी डॉ. राजेश शिंदे, नवोपक्रम, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ.मारुती गायकवाड, आय.क्यू.ए.सी.चे संचालक डॉ. बी.एस. रेड्डी, कार्यकारी अभियंता तानाजी हुस्सेकर, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, गोविंद हंबर्डे, किरण शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी यांच्यासह विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# टीईटी पेपरफुटीची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करा



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १ जुलै -**

राज्यात गाजत असलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) पेपरफुटी प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी काँग्रेस पक्षाच्या वतीने तहसीलदार, मुदखेड यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस गिरीश भिमअप्पा कोत्तावार यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या निवेदनात, टीईटी पेपरफुटीमुळे प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जात असून परीक्षा व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास डळमळीत झाला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. अशा घटनांमुळे गुणवत्तेपेक्षा गैरप्रकारांना प्रोत्साहन मिळत असून शिक्षण क्षेत्राच्या विश्वासार्हतेलाही मोठा धक्का बसत असल्याची खंत व्यक्त करण्यात आली.

निवेदनात पेपरफुटी प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व वेळेत चौकशी करून दोषी व्यक्ती, अधिकारी व संबंधित घटकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात कोणत्याही स्पर्धा परीक्षेचा पेपर फुटू नये यासाठी अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था, डिजिटल देखरेख आणि गोपनीय यंत्रणा अधिक सक्षम करण्याची गरजही व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढवून विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण करावा तसेच प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करून त्यांना न्याय मिळेल, याची शासनाने हमी द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी काँग्रेसचे युवक जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील गाडे, उपाध्यक्ष करीम खॉसाहब,सुर्यकांत चौदंते सर,सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे, गट नेते प्रतीनीधी तथा युवक शहर आध्यक्ष मजीब पठाण, नगरसेवक अविनाश चौदंते, गजानन संबोड,नुतन ओबीसी तालुकाध्यक्ष बालाजी गुळेवाड, शिवानंद देवके, सुभाष चौदंते, मा. नगरसेवक गंगाधर डांगे, सुरेश ढगे, रमेश बोडके,बंडू पाटील खानसोळे, विठल आचार्य, श्याम पाटील शिंदे,वेदांत शेवटे,कुलदीप मल्लेवार,

गोविद वडजे पाटील, केशव पाटील टाकळीकर,बालाजीजंगीलवाड,पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनाची गंभीर दखल घेऊन शासनाकडे योग्य ती शिफारस करण्यात यावी, अशी विनंती तहसीलदारांकडे करण्यात आली.

## दूध डेअरी ते गोविंद गार्डन हडकोपर्यंतची स्ट्रीट लाईट चालू करा : भि.ना. गायकवाड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १ जुलै -**

दूध डेअरी उस्मानगर रोड ते गोविंद गार्डन हडकोपर्यंतची स्ट्रीट लाईट गेल्या अनेक वर्षांपासून बंद आहेत. सन २०२३ पासून अनेक वेळा लेखी विनंत्या केल्या, परंतु महानगरपालिकेने याकडे सतत दुर्लक्ष केले आहे. येत्या तीस दिवसात स्ट्रीट लाईट चालू करण्यात आली नाही तर दि. २ ऑगस्ट २०२६ रोजी रविवारी आयुक्तांच्या शासकीय निवासस्थानासमोर ठिया आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शिवसेना नेते भि.ना. गायकवाड यांनी महानगरपालिका आयुक्त यांना



निवेदनाद्वारे दिला आहे.

आयुक्तांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, ढवळे कॉर्नर येथे तीन वाईन शॉप आहेत. सायंकाळी सहा वाजल्यानंतर महिला व मुलींना येथून ये-जा करणे जोखमीचे झाले आहे. अंधाराचा फायदा घेऊन वाटमारीचे प्रकारसुद्धा घडत आहेत. दूध डेअरी ते ढवळे कॉर्नरपर्यंत मोठी बाजारपेठ असल्यामुळे लोकांची नेहमी वर्दळ असते. शिवाय हा राष्ट्रीय महामार्ग असल्यामुळे अवजड वाहनांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. विरूद्ध दिशेने येणार्या वाहनांच्या प्रखर प्रकाशामुळे वाहनधारकांना पादचारी दिसत नाहीत. त्यामुळे अपघातात जिवीत हानी होऊ शकते. या रोडवर नागरी वस्ती मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे येत्या ३० दिवसात स्ट्रीट लाईट चालू करण्यात यावी, असा इशारा शिवसेना नेते भि.ना. गायकवाड यांनी महानगरपालिका आयुक्त यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

# लोकस्वराज्य आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांचे ग्रामीण भागात दौरे

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १ जुलै -**

अनुसूचित जातींच्या अ.ब.क.ड. उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भराडे यांच्या नेतृत्वाखाली धर्माबाद ते मुंबई पद यात्रा सुरू असून ०६ जुलै रोजी मुंबईतील मंत्रालयावर भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात राज्यभरातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर भोकर तालुक्यात ग्रामीण भागात जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. सोमठाणा, देवठाणा, बाचोटी, मोघाळी, हाळदा, हाडोळी, नागापूर,लगळूद,रावणगाव आदी गावांमध्ये बैठका व सभांचे आयोजन करण्यात आले. या सभांमधून अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची गरज, मातंग समाजासमोरील विविध प्रश्न, त्यावरील उपाययोजना तसेच समाजाची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्थिती याबाबत प्रबोधन करण्यात आले.मोघाळी येथील सभेत लोकस्वराज्य आंदोलनाचे मराठवाडा उपाध्यक्ष के. वाय. देवकांबळे यांनी म्हणाले, बौद्ध आणि आपण भाऊ आहोत. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या लढ्यात वैचारिक मतभेद होऊ शकतात मात्र ते केवळ वैचारिक पातळीवरच राहावेत. मातंग समाजातील कार्यकर्ते व नेत्यांनी बौद्ध समाजाविषयी पातळी सोडून बोलू नये. तसेच दोन्ही समाजांतील नेते व कार्यकर्त्यांनी संयम राखून समाजात दुरावा निर्माण होईल, अशी कोणतीही प्रक्षोभक वक्तव्ये टाळावीत व सहकार्याची भूमिका घ्यावी जनजागृती मोहिमेला ग्रामीण भागातून चांगला प्रतिसाद मिळत असून मातंग समाजात एकजूट निर्माण होत असल्याचा दावा आंदोलनाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. तसेच ०६ जुलै रोजी मुंबई येथे मंत्रालयावर होणाऱ्या मोर्चात भोकर तालुक्यातून हजारोंच्या संख्येने समाजबांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.या दौऱ्यात मराठवाडा उपाध्यक्ष के. वाय. देवकांबळे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब टिकेकर, प्रख्यात गायक व शाहिर माधव वाघमारे, कृष्णूरकर, तालुकाध्यक्ष मारोती टिकेकर, जिल्हा संपर्कप्रमुख साईप्रसाद जलपतराव, साहेबराव वाघमारे तसेच जिल्हा प्रवक्ते व पत्रकार अनिल डोईफोडे हे जनजागृतीसाठी परिश्रम घेत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



# विश्वास, विकास और जनकल्याण की नई यात्रा



## सुरक्षित, स्वस्थ और समृद्ध मध्यप्रदेश

विकास तब सार्थक होता है जब उसका लाभ समाज के प्रत्येक व्यक्ति तक पहुंचे और शासन की योजनाएं केवल घोषणाओं तक सीमित न रहकर लोगों के जीवन में वास्तविक परिवर्तन का माध्यम बनें। इसी सोच के साथ मध्यप्रदेश में स्वास्थ्य सेवाओं के विस्तार, सामाजिक सुरक्षा के सुदृढ़ीकरण, डिजिटल सुशासन, आधुनिक अधोसंरचना, निवेश संवर्धन तथा धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन जैसे विविध क्षेत्रों में निरंतर कार्य किया जा रहा है। उद्देश्य केवल सुविधाएं बढ़ाना नहीं, बल्कि नागरिकों के जीवन को अधिक सुरक्षित, स्वस्थ, सम्मानजनक और अवसरों से परिपूर्ण बनाना है। आयुष्मान भारत निरामयम् जैसी स्वास्थ्य सुरक्षा योजनाओं से लेकर प्रधानमंत्री आवास योजना, मुख्यमंत्री संबल योजना, साइबर तहसील, सम्पदा 2.0, ई-ऑफिस, जल जीवन मिशन, मेट्रो रेल परियोजनाओं और निवेश प्रोत्साहन योजनाओं तक, विकास का यह मॉडल शासन को अधिक संवेदनशील, पारदर्शी और नागरिक केंद्रित बना रहा है। आधुनिक चिकित्सा सुविधाओं का विस्तार, तकनीक आधारित सेवाओं की उपलब्धता, आधारभूत संरचना का सुदृढ़ीकरण तथा समावेशी कल्याण की यह सतत यात्रा विकसित मध्यप्रदेश की मजबूत नींव तैयार कर रही है, जहां विकास का केंद्र सरकार नहीं, बल्कि प्रत्येक नागरिक का बेहतर जीवन है।

## हर नागरिक के लिए बेहतर स्वास्थ्य का संकल्प


चिकित्सकीय परामर्श देते डॉक्टर

स्वस्थ नागरिक ही समृद्ध समाज और विकसित राज्य की सबसे बड़ी पूंजी होते हैं। इसी सोच के साथ मध्यप्रदेश में स्वास्थ्य सेवाओं के विस्तार, आधुनिक चिकित्सा अधोसंरचना के विकास तथा गरीब और जरूरतमंद परिवारों को बेहतर उपचार उपलब्ध कराने की दिशा में निरंतर कार्य किया जा रहा है। आयुष्मान भारत निरामयम् योजना के माध्यम से लाखों परिवारों को उपचार सुरक्षा मिली है, वहीं मातृ एवं शिशु स्वास्थ्य, गंभीर बीमारियों के उपचार तथा चिकित्सा शिक्षा के विस्तार के लिए भी अनेक महत्वपूर्ण कदम उठाए गए हैं। प्रदेश में नए मेडिकल कॉलेजों की स्थापना और स्वास्थ्य सुविधाओं का विस्तार चिकित्सा सेवाओं को अधिक सुलभ और प्रभावी बना रहा है।

### प्रमुख योजनाएं

**आयुष्मान भारत निरामयम् मध्यप्रदेश**
- पात्र परिवारों को सूचीबद्ध अस्पतालों में निःशुल्क उपचार की सुविधा उपलब्ध कराकर गुणवत्तापूर्ण स्वास्थ्य सेवाओं तक पहुंच सुनिश्चित की जा रही है।

**मुख्यमंत्री बाल हृदय उपचार योजना**
- गंभीर हृदय रोग से पीड़ित बच्चों के उपचार के लिए आर्थिक सहायता प्रदान कर उन्हें नया जीवन देने की संवेदनशील पहल।

**मातृ एवं शिशु स्वास्थ्य कार्यक्रम**
- गर्भवती महिलाओं, नवजात शिशुओं और बच्चों के स्वास्थ्य संरक्षण के लिए अनेक योजनाओं का प्रभावी संचालन।

**मेडिकल कॉलेज विस्तार कार्यक्रम**
- प्रदेश में चिकित्सा शिक्षा एवं विशेषज्ञ स्वास्थ्य सेवाओं की उपलब्धता बढ़ाने के लिए नए मेडिकल कॉलेजों और स्वास्थ्य संस्थानों का विकास।

### प्रमुख बातें
- हर जरूरतमंद तक उपचार की पहुंच
- मातृ एवं शिशु स्वास्थ्य पर विशेष ध्यान
- गंभीर बीमारियों के उपचार में सहायता
- चिकित्सा अधोसंरचना का निरंतर विस्तार
- स्वास्थ्य सुरक्षा से सशक्त समाज

## सम्मानजनक जीवन और समावेशी विकास


वितरण

### गरीब एवं सामाजिक सुरक्षा

समावेशी विकास का उद्देश्य केवल आर्थिक प्रगति नहीं, बल्कि समाज के कमजोर और जरूरतमंद वर्गों को सुरक्षा और सम्मान प्रदान करना भी है। मध्यप्रदेश सरकार गरीब परिवारों, श्रमिकों, वरिष्ठ नागरिकों, दिव्यांगजनों तथा अन्य पात्र हितग्राहियों के लिए अनेक सामाजिक सुरक्षा योजनाएं संचालित कर रही है। पक्का आवास, खाद्यान्न सुरक्षा, पेंशन, श्रमिक कल्याण और सामाजिक सहायता जैसी योजनाएं लाखों परिवारों के जीवन में स्थिरता और आत्मविश्वास का आधार बन रही हैं।

### प्रमुख बातें
- गरीब परिवारों के लिए आवास सुरक्षा
- श्रमिकों के लिए सामाजिक संबल
- जरूरतमंदों को नियमित सहायता
- खाद्यान्न सुरक्षा का मजबूत तंत्र
- समावेशी विकास की दिशा में सतत प्रयास



प्रधानमंत्री आवास का लाभार्थी परिवार

### प्रमुख योजनाएं

**प्रधानमंत्री आवास योजना**
- पात्र परिवारों को पक्का और सुरक्षित आवास उपलब्ध कराने की महत्वपूर्ण पहल।

**मुख्यमंत्री संबल योजना**
- असंगठित क्षेत्र के श्रमिक परिवारों को सामाजिक सुरक्षा एवं विभिन्न परिस्थितियों में आर्थिक सहायता।

**सामाजिक सुरक्षा पेंशन योजनाएं**
- वृद्धजन, दिव्यांगजन एवं निराश्रित व्यक्तियों को नियमित आर्थिक सहायता।

**खाद्यान्न सुरक्षा कार्यक्रम**
- राष्ट्रीय खाद्य सुरक्षा व्यवस्था के अंतर्गत पात्र परिवारों को रियायती अथवा निःशुल्क खाद्यान्न उपलब्ध कराया जा रहा है।

## निवेश, नवाचार और नई संभावनाओं का विस्तार


जल जीवन मिशन के अंतर्गत नल कनेक्शन

### अधोसंरचना, निवेश एवं पर्यटन

आधुनिक अधोसंरचना किसी भी विकसित राज्य की आर्थिक प्रगति का आधार होती है। मध्यप्रदेश में सड़क, शहरी परिवहन, जलापूर्ति, औद्योगिक निवेश तथा धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन को नई गति देने के लिए अनेक महत्वपूर्ण परियोजनाएं संचालित की जा रही हैं। भोपाल और इंदौर मेट्रो परियोजनाएं आधुनिक शहरी परिवहन की दिशा में महत्वपूर्ण कदम हैं। जल जीवन मिशन और अमृत मिशन जैसी योजनाएं नागरिक सुविधाओं को सुदृढ़ बना रही हैं। निवेश प्रोत्साहन नीतियों तथा धार्मिक पर्यटन के विकास से प्रदेश आर्थिक और सांस्कृतिक दोनों क्षेत्रों में नई पहचान बना रहा है।

### प्रमुख योजनाएं

**मेट्रो रेल परियोजना**
- भोपाल और इंदौर में आधुनिक, सुरक्षित और पर्यावरण अनुकूल सार्वजनिक परिवहन व्यवस्था का विकास।

**जल जीवन मिशन**
- हर घर तक नल से स्वच्छ पेयजल उपलब्ध कराने का व्यापक अभियान।

**अमृत मिशन**
- शहरी जलापूर्ति, सीवरेज तथा बुनियादी नागरिक सुविधाओं का विस्तार।

**औद्योगिक निवेश संवर्धन**
- निवेशकों के लिए अनुकूल वातावरण, सिंगल विंडो सुविधा तथा नए उद्योगों को प्रोत्साहन।

**धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन विकास**
- उज्जैन, ओंकारेश्वर, अमरकंटक, चित्रकूट सहित प्रमुख तीर्थ एवं पर्यटन स्थलों का समग्र विकास तथा सिंहस्थ 2028 की तैयारियां।

### प्रमुख बातें


महाकाल लोक

- धार्मिक एवं सांस्कृतिक पर्यटन का विस्तार
- आधुनिक परिवहन व्यवस्था
- हर घर तक जल पहुंचाने का अभियान
- निवेश और रोजगार को नई गति
- पारदर्शी और समयबद्ध प्रशासन
- विकसित मध्यप्रदेश की मजबूत अधोसंरचनाप्राथमिकता

## तकनीक के साथ पारदर्शी और त्वरित सेवाएं

### डिजिटल सुशासन

डिजिटल तकनीक ने शासन व्यवस्था को अधिक पारदर्शी, सरल और नागरिक केंद्रित बनाने में महत्वपूर्ण भूमिका निभाई है। मध्यप्रदेश डिजिटल सुशासन के क्षेत्र में लगातार नवाचार कर रहा है। राजस्व सेवाओं से लेकर संपत्ति पंजीयन, पुलिस व्यवस्था, लोक सेवाओं की ऑनलाइन उपलब्धता और कार्यालयीन कार्यप्रणाली तक तकनीक का व्यापक उपयोग किया जा रहा है। इससे नागरिकों का समय बच रहा है, पारदर्शिता बढ़ रही है और सेवाओं की गुणवत्ता में निरंतर सुधार हो रहा है।



लोक सेवा केंद्र

### प्रमुख नवाचार

**साइबर तहसील**
- नामांतरण सहित विभिन्न राजस्व प्रकरणों के डिजिटल और समयबद्ध निराकरण की अभिनव व्यवस्था।

**सम्पदा 2.0**
- संपत्ति पंजीयन प्रक्रिया को अधिक पारदर्शी, सुरक्षित और सुविधाजनक बनाने वाला आधुनिक डिजिटल प्लेटफॉर्म।

**ई-जीरो एफआईआर**
- ऑनलाइन शिकायत दर्ज करने की सुविधा के माध्यम से नागरिकों को त्वरित पुलिस सहायता।

**एमपी ई-सेवा**
- विभिन्न शासकीय सेवाओं को एकीकृत डिजिटल प्लेटफॉर्म पर उपलब्ध कराने की व्यवस्था।

### प्रमुख बातें
- घर बैठे अनेक सरकारी सेवाएं
- डिजिटल राजस्व सेवाएं
- तकनीक आधारित सुशासन
- नागरिक सुविधा सर्वोच्च प्राथमिकता
- पारदर्शी और समयबद्ध प्रशासन

D19087/26

**जनकल्याण से जनविश्वास, जनविश्वास से जनसमृद्धि और जनसमृद्धि से विकसित मध्यप्रदेश की ओर निरंतर अग्रसर।**